दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २८८ I शनिवार १ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## हॉकी जर्सीच्या भगव्या रंगावरून वाद; माजी खेळाडूंचा विरोध




**नवी दिल्ली :** २०२६ हॉकी विश्वचषकापूर्वी भारतीय पुरुष व महिला हॉकी संघाच्या जर्सीचा पारंपरिक निळा रंग बदलून भगवा करण्यात आल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. माजी कर्णधार विरेन रासकिन्हा यांनी हा निर्णय लज्जास्पद असल्याची टीका करत, निळी जर्सी ही भारतीय हॉकीची ओळख असल्याचे म्हटले. माजी कर्णधार पतगत सिंग यांनीही रंगबदलाबद्दल नाराजी व्यक्त केली. ओडिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनीही हा निर्णय दुर्दैवी असल्याचे सांगत, निळा रंग हा भारतीय हॉकीच्या वारशाशी आणि भावनेशी जोडलेला असल्याचे नमूद केले. मात्र, हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप कुमार तिर्की यांनी खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ यांच्या सूचनांनुसारच हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले. विश्वचषकानंतर खेळाडूंना नवी जर्सी पसंत न पडल्यास बदलाचा विचार केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### महत्त्वाचे..

## मोदींचे निकटवर्तीय शहजाद पूनावालांचा भाजपाचा राजीनामा!



नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाची बाजू विविध माध्यमांवर आक्रमकपणे मांडण्यासाठी ओळखले जाणारे पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. ते पंतप्रधान नरेंद्र मोदींचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. पूनावाला यांनी गुरुवारी संध्याकाळी पक्षश्रेष्ठींकडे आपला राजीनामा सादर केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मात्र, त्यांच्या या तडकाफडकी राजीनाम्याचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. त्यांनी आपल्या बायोमधून 'भाजप' हा शब्द पूर्णपणे हटवला आहे. नवीन बायोमध्ये त्यांनी स्वतःची ओळख 'भारतीय' आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'आजीवन अनुयायी' अशी करून दिली आहे.याशिवाय त्यांनी आपल्या 'एक्स' हँडलचे नाव बदलून 'शहजाद जय हिंद' असे केले असून, बायोमध्ये धर्म इस्लाम, संस्कृती हिंदू आणि विचारधारा भारतीय असा स्पष्ट उल्लेख केला आहे. पूनावाला हे आता दुसऱ्या कोणत्याही पक्षात प्रवेश करण्याची शक्यता अत्यंत कमी मानली जात असून, त्यांनी थेट राजकीय संन्यास घेतल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.

# ४.५० लाख कोटींच्या विकास पॅकेजला केंद्राचा हिरवा कंदील!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :केंद्र सरकारने शुक्रवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी, अक्षय ऊर्जा, क्रीडा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील पाच महत्त्वाकांक्षी योजनांना मंजुरी देत देशाच्या विकासाला मोठी चालना दिली. सुमारे ४.५० लाख कोटी रुपयांच्या या पॅकेजमध्ये पीएम-किसान सन्मान निधी योजना पुढील पाच वर्षांसाठी सुरू ठेवण्याचा, 'पीएम सूर्य सरोवर' योजनेद्वारे फ्लोटिंग सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा, 'खेलो इंडिया' व राष्ट्रीय क्रीडा महासंघासाठी मोठ्या निधीची तरतूद, तसेच 'समुद्र मंथन' आणि ट्विन ट्यूब बोगदा प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत या निर्णयांची माहिती दिली.**

सरकारच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बळ, स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन, रोजगारनिर्मिती आणि देशातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. कृषी, ऊर्जा, क्रीडा आणि सागरी विकासाला चालना देत भारताची अर्थव्यवस्था अधिक गतिमान करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे वैष्णव यांनी सांगितले.

यामध्ये सर्वात मोठा निर्णय प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा आहे. ही योजना आणखी पाच वर्षांसाठी म्हणजे २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी वाढवण्यात आली असून त्यासाठी ३.१५ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय पाण्यावर तरंगणाऱ्या सौरऊर्जा प्रकल्पांसाठी 'पीएम सूर्य सरोवर योजना', क्रीडा क्षेत्रासाठी मोठी आर्थिक मदत तसेच पायाभूत सुविधांसाठी महत्त्वाच्या प्रकल्पांनाही हिरवा कंदील देण्यात आला आहे.

**क्रीडा व पायाभूत सुविधांना बूस्टर**

- 'खेलो इंडिया' व राष्ट्रीय क्रीडा महासंघासाठी ₹३६,४४१ कोटी
- 'समुद्र मंथन' प्रकल्पासाठी ₹८४,०८४ कोटी
- ट्विन ट्यूब बोगदा प्रकल्पासाठी ₹९,७७९ कोटी
- वाहतूक, सागरी विकास आणि क्रीडा सुविधांमध्ये मोठी सुधारणा अपेक्षित.

**'पीएम सूर्य सरोवर' योजनेला मंजुरी**

- ₹५,०७० कोटींचा निधी
- धरणे, तलाव व जलाशयांवर ५,००० मेगावॅट फ्लोटिंग सोलर प्रकल्प
- १७ हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा
- पाण्याचे बाष्पीभवन कमी, स्वच्छ ऊर्जा उत्पादनाला चालना

**पीएम-किसानला आणखी पाच वर्षांची मुदत**

- ३.१५ लाख कोटींची तरतूद
- २०२६-२७ ते २०३०-३१ पर्यंत योजना सुरू
- पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी ₹६,००० (तीन हप्त्यांत) आतापर्यंत २३ हप्त्यांत ₹४.४७ लाख कोटी वितरित



केंद्र सरकारने पीएम किसान सन्मान निधी योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दरवर्षी ६ हजार रुपये थेट जमा केले जातील. ही रक्कम २ हजार रुपयांच्या तीन हप्त्यांमध्ये दिली जाईल.

या योजनेचा उद्देश पेरणी, लागवड आणि कापणीच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे त्यांना खासगी सावकार किंवा महागड्या कर्जावर अवलंबून राहावे लागणार नाही.

सरकारच्या माहितीनुसार आतापर्यंत या योजनेअंतर्गत २३ हप्त्यांद्वारे ४.४७ लाख कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. या योजनेचा सर्वाधिक फायदा लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना होत आहे.

मंत्रिमंडळाने पीएम सूर्य सरोवर योजनेसाठी ५,०७० कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत देशभरातील जलाशय, धरणे आणि तलावांवर फ्लोटिंग सोलर (तरंगते सौरऊर्जा) प्रकल्प उभारले जाणार आहेत.

पुढील पाच वर्षांत ५,००० मेगावॅट क्षमतेची फ्लोटिंग सौरऊर्जा निर्मिती करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. या योजनेचे अनेक फायदे सरकारने (पान ४ वर)

## धमकीप्रकरणी दिपके यांनी सत्य समोर आणावे

### मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यास सरकार कटिबद्ध : मंत्री डॉ. विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी :** महायुती सरकार मराठा समाजाच्या सर्व मागण्यांबाबत सकारात्मक असून, मनोज जरांगे पाटील यांच्यावर पुन्हा आंदोलन करण्याची वेळ येऊ देणार नाही. आवश्यकता भासल्यास त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा करून समाधान केले जाईल, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. त्याचवेळी अभिजित दिपके यांनी धमकी व ऑफर देणाऱ्यांची नावे जाहीर करावीत आणि केवळ भारतीय जनता पक्षाला बदनाम करण्यासाठी संदिग्ध वक्तव्ये करू नयेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. (पान ४ वर)

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची बैठक आटोपली...

### अन् वन अधिकाऱ्याने ४५ लाखांची लाच घेतली!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी श्रीनिवास लखमवाड यांना तब्बल ४५ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीची बैठक आटोपल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

एसीबीच्या माहितीनुसार, सन २०२५-२६ मधील वृक्षलागवडीची बिले मंजूर करणे, कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करणे तसेच निलंबनाची कारवाई मागे घेण्यासाठी श्रीनिवास लखमवाड यांनी ४५ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी तक्रारदाराने २९ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. (पान ४ वर)

# पाकिस्तानला जाब विचारा

### पीओकेतील ४० मृत्यू : भारताचा आंतरराष्ट्रीय समुदायाकडे संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**नवी दिल्ली :** पाकव्याप्त काश्मीर (पीओके) येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर झालेल्या लष्करी कारवाईबाबत भारताने तीव्र चिंता व्यक्त करत आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला मानवाधिकार उल्लंघनासाठी जबाबदार धरावे, अशी मागणी केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही भूमिका स्पष्ट केली.

जयस्वाल म्हणाले की, पीओकेमध्ये शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांविरुद्ध बळाचा वापर करण्यात आला असून या कारवाईत जवळपास ४० नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. लोकशाही पद्धतीने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर अशा प्रकारे दडपशाही करणे अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, पीओकेमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरही स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. निवडणूक प्रक्रियेत फेरफार झाल्याचा आरोप आंदोलकांनी (पान ४ वर)

## रानडुकराच्या धडकेत ३२ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोरडगाव :**कोरडगाव - पाथर्डी मार्गावरील न्यू बजरंग दूध डेअरीजवळ शनिवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास रानडुकराच्या धडकेत मोटारसायकलस्वार युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. जावेद अस्लम शेख (वय ३२) असे मृत युवकाचे नाव असून, त्यांच्या अकाली निधनामुळे कोरडगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जावेद शेख हे आपल्या ११ वर्षीय मुलीला नवोदय परीक्षेच्या अतिरिक्त वर्गासाठी सकाळी शाळेत सोडण्यासाठी गेले होते. मुलीला सुरक्षितपणे शाळेत सोडल्यानंतर ते मोटारसायकलवरून घरी परतत असताना न्यू बजरंग दूध डेअरीजवळ अचानक रस्त्यालगतच्या झुडपातून एक रानडुक्कर भरधाव वेगाने बाहेर आले. त्याने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने त्यांचा वाहनावरील ताबा सुटला आणि ते रस्त्यावर आपटले. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पाथर्डी वनविभागाचे कर्मचारीही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेतला. कोरडगाव-पाथर्डी मार्गालगत वन्यप्राण्यांचा वाढता वावर वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. संबंधित मार्गावर वनविभागाने इशारा फलक, संरक्षक उपाययोजना आणि वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रणासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अंचलगाव पाटी येथे तिहेरी भीषण अपघात

### शेकडो कोंबड्यांचा मृत्यू, महामार्गावरील वाहतूक ठप्प

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**कोपरगाव :** तालुक्यातील कोपरगाव - येवला महामार्गावरील अंचलगाव पाटीजवळ गुरुवारी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास कंटेनर, ट्रक आणि कोंबड्यांनी भरलेल्या पिकअप वाहनाचा भीषण तिहेरी अपघात झाला.

या अपघातात तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून पिकअपमधील शेकडो कोंबड्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे विस्कळीत झाली आणि दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. कोपरगावकडून येवल्याकडे जाणारा कंटेनर (ऋा ०६ रु ३४१६) आणि येवल्याकडून कोपरगावच्या दिशेने येणारा ट्रक (एमएच ४१ अढ २१२४) यांच्यात अंचलगाव पाटीजवळील गतीरोधकावर समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेनंतर मागून येणारे कोंबड्यांनी भरलेले पिकअप वाहन (एमएच ०४ एमआर ८१८७) देखील नियंत्रण सुटल्याने अपघातात सापडले.अपघाताची तीव्रता इतकी होती की तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. पिकअपमधील मोठ्या प्रमाणातील कोंबड्या मृत्युमुखी पडल्या, तर वाहनचालक जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या प्रकृतीबाबत अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, स्थानिक नागरिक आणि मदत पथकाने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्यात आले.

दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून गतीरोधक, वाहनांचा वेग किंवा अन्य तांत्रिक कारणांचा तपास पोलीस करत आहेत. मात्र शुक्रवारी सायंकाळी वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू होते.

## राहुरीत अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**२०.५० लाखांचा मुद्देमाल जप्त**

**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मिरजगाव व राहुरी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत धडक कारवाई करत दोन गुन्हे दाखल केले असून, दोन आरोपींना ताब्यात घेत २० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे तसेच श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दोन विशेष पथके तयार करून ही कारवाई केली.

बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे ३० जुलै रोजी मिरजगाव व राहुरी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी पंचांसमक्ष छापे टाकण्यात आले. मिरजगाव येथे अनिकेत उर्फ योगेश अनिल सकट (वय २७, रा. रातंजन, ता. कर्जत) याच्याकडून १५ लाख रुपयांचा विनाक्रमांकाचा हिरव्या रंगाचा डंपर आणि ३० हजार रुपयांची वाळू असा एकूण १५ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मिरजगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९६/२०२६, बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर राहुरी येथे आकाश काशिनाथ चव्हाण (वय २२, रा. तांदुळवाडी, ता. राहुरी) याच्याकडून ५ लाख रुपयांचा टाटा (पान ४ वर)

## पुण्यात रॅगिंग गँगचा धुमाकूळ

### एमबीबीएसचा विद्यार्थी १५ दिवसांपासून बेपत्ता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**पुणे :** पुण्यातील बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (बीजे मेडिकल) रॅगिंगच्या कथित त्रासाला कंटाळून एमबीबीएस प्रथम वर्षाचा विद्यार्थी तन्मय वंगे (रा. पेठवडगाव, जि. कोल्हापूर) गेल्या १५ दिवसांपासून बेपत्ता असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तन्मयला काही विद्यार्थ्यांकडून ग्रामीण पार्श्वभूमीवरून सातत्याने मानसिक छळ करण्यात येत असल्याची तक्रार त्याचे वडील अजयकुमार वंगे यांनी पोलिस आणि महाविद्यालय प्रशासनाकडे केली आहे.

उत्कर्ष सिंग, श्रेया यादव आणि त्यांच्या ग्रुप कडून तन्मयला सतत त्रास दिला जात होता. त्याच्या ग्रामीण पार्श्वभूमीवरुन त्याला हिणवलं जात होतं. तन्मयनं शालेय जीवनातील मित्र हर्षवर्धन चव्हाण याच्याकडे जाऊन रॅगिंगमुळं झालेल्या त्रासाची माहिती दिली होती. हर्षवर्धन चव्हाणला तन्मयने काकाकडे जाणार असल्याचे सांगितल्याचे अजयकुमार वंगे म्हणाले. तन्मय निघून गेल्याने त्याच्या आईला दवाखान्यात दाखल करावे लागले.

१८ जुलै रोजी नातेवाईकांकडे जात असल्याचे (पान ४ वर)

# राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेमार्गावरून वाद पेटला!

### भूसंपादन सुरू : सुपीक शेती वाचवण्यासाठी शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

**जालिंदर ढोकणे । राष्ट्र सह्याद्री**





**उंबरे :** केंद्र सरकारने महाराष्ट्रातील रेल्वे विकासाला मोठी गती देत राहुरी-शनिशिंगणापूर नवीन रेल्वेमार्ग आणि पुणतांबा-साईनगर शिर्डी दुहेरीकरण प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकल्पांना विशेष रेल्वे प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला असून सक्षम भूसंपादन अधिकाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे. रेल्वे मंत्रालयाच्या मते, या प्रकल्पांमुळे राहुरी, शिर्डी आणि परिसरातील रेल्वे संपर्क अधिक सक्षम होऊन प्रवासी व मालवाहतुकीला मोठा लाभ होणार आहे. दरम्यान या प्रकल्पाच्या भूसंपादनाला प्रारंभ झाला असून रेल्वे विभागाने त्यासाठी लागणारे साहित्य या प्रस्तावित मार्गालगत उतरविण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांनी मात्र आपल्या सुपीक जमिनी वाचविण्यासाठी रेल्वे खात्याशी संघर्ष करण्याचा चंग बांधला आहे.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, राज्यात सध्या १ लाख ४२ हजार ६३५ कोटी रुपयांच्या खर्चाचे ५२ रेल्वे प्रकल्प सुरू असून २०२६-२७ या आर्थिक वर्षात रेल्वे विकासासाठी २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नाशिक रोड-शिर्डी, पुणे-अहिल्यानगर, इंदूर-मनमाड, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव यांसारख्या महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांचे कामही विविध टप्प्यांत सुरू आहे.

मात्र, राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वेमार्गाला स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या मार्गावर आधीच सिमेंट कॉंक्रीटचा सक्षम रस्ता उपलब्ध असताना नवीन रेल्वेमार्गाची गरज नसल्याचा त्यांचा दावा आहे. या प्रकल्पासाठी शेकडो शेतकऱ्यांच्या बागायती व सुपीक जमिनीचे भूसंपादन होणार असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

बाधित शेतकरी उमाकांत हापसे (ब्राह्मणी, ता. राहुरी) यांनी, सुपीक शेती उद्ध्वस्त करून हा रेल्वेमार्ग उभारण्याऐवजी प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी केली आहे. त्यामुळे सरकार विकास आणि शेतकऱ्यांचे हित यामध्ये समतोल कसा साधणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# रेल्वे विकासाची गती आणि शेतकऱ्यांना न्याय... समतोलाचा मार्ग शोधायलाच हवा




महाराष्ट्रातील रेल्वे विकासाला केंद्र सरकारने दिलेली नव्याने चालना ही निःसंशय स्वागतार्ह आहे. राज्यात सध्या लाखो कोटी रुपयांचे रेल्वे प्रकल्प सुरू असून मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले मार्ग प्रत्यक्षात येऊ लागले आहेत. केंद्र सरकारने रेल्वे विकासासाठी यंदा अभूतपूर्व आर्थिक तरतूद केली आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रात सध्या १ लाख ४२ हजार ६३५ कोटी रुपयांचे ५२ रेल्वे प्रकल्प विविध टप्प्यांत सुरू आहेत. याशिवाय २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्राच्या रेल्वे विकासाकरिता २३ हजार ९२६ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. राहुरी–शनिशिंगणापूर नवीन रेल्वेमार्ग, पुणतांबा–साईनगर शिर्डी दुहेरीकरण, नाशिक रोड–शिर्डी, पुणे–अहिल्यानगर, इंदूर–मनमाड, सोलापूर–तुळजापूर–धाराशिव, जालना–खामगाव तसेच धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर यांसारखे प्रकल्प या व्यापक नियोजनाचा भाग आहेत. विशेष म्हणजे, जालना–खामगाव रेल्वेमार्गासाठी सुमारे ४,९०७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यात केंद्र आणि राज्य सरकार प्रत्येकी ५० टक्के वाटा उचलणार आहेत. या आकडेवारीवरून महाराष्ट्रात रेल्वे पायाभूत सुविधांवर केंद्र सरकारचा भर स्पष्टपणे दिसून येतो.

अशा निर्णयांमुळे राज्याच्या दळणवळण व्यवस्थेला नवी दिशा मिळणार आहे. उद्योग, पर्यटन, शेती आणि रोजगाराच्या दृष्टीने या प्रकल्पांचे महत्त्व कोणीही नाकारू शकत नाही.

रेल्वे ही केवळ वाहतुकीची सुविधा नसून ती एखाद्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाची जीवनवाहिनी असते. ज्या भागात रेल्वे पोहोचते, तेथे उद्योग येतात, बाजारपेठा विस्तारतात, पर्यटनाला चालना मिळते आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. शिर्डीसारख्या जागतिक धार्मिक स्थळाला अधिक सक्षम रेल्वे जाळे मिळाल्यास लाखो भाविकांची सोय होईल. मालवाहतूक स्वस्त आणि जलद झाल्यास स्थानिक उद्योगांना नवे बाजार उपलब्ध होतील. त्यामुळे सरकारचा रेल्वे विकासाचा दृष्टिकोन योग्यच म्हणावा लागेल.

मराठवाड्याच्या संदर्भात तर या निर्णयांचे महत्त्व अधिक आहे. अनेक दशकांपासून हा प्रदेश रेल्वे सुविधांच्या बाबतीत मागे राहिला. बीड जिल्हा तर रेल्वे नकाशावरील उपेक्षित जिल्हा म्हणून ओळखला जात होता. नगर–बीड रेल्वेमार्गासाठी अनेक आंदोलने झाली. गोपीनाथ मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर हा मार्ग वास्तवात आला. आता परळीपर्यंत रेल्वे पोहोचविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे आज ज्या नव्या मार्गांना मंजुरी मिळत आहे, त्याकडे केवळ राजकीय घोषणा म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.

परंतु विकासाच्या या चित्राला दुसरी बाजूही आहे. राहुरी–शनिशिंगणापूर रेल्वेमार्गासाठी सुरू झालेल्या भूसंपादनाला स्थानिक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे. त्यांचा विरोध विकासाला नसून आपल्या उपजीविकेच्या साधनांच्या संरक्षणासाठी आहे. बागायती आणि अत्यंत सुपीक जमिनी रेल्वेमार्गात जात असतील, तर त्या शेतकऱ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. पिढ्यान् पिढ्या कसलेल्या जमिनीचा मोबदला केवळ आर्थिक भरपाईने मिळत नाही. शेती हा त्यांच्या अस्तित्वाचा आणि ओळखीचाही भाग असतो.

शेतकऱ्यांचा आणखी एक मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे. ज्या परिसरात आधीच सक्षम सिमेंट काँक्रीट रस्ता उपलब्ध आहे, तेथे रेल्वेमार्गाची अपरिहार्यता काय, हा प्रश्न ते उपस्थित करीत आहेत. हा आक्षेप तांत्रिकदृष्ट्या योग्य की अयोग्य, याचे उत्तर रेल्वे प्रशासनाने अभ्यासपूर्ण पद्धतीने द्यायला हवे. कोणताही प्रकल्प लोकांवर लादण्याऐवजी त्यामागील गरज, भविष्यातील वाहतूक अंदाज, आर्थिक लाभ आणि पर्यायी मार्गांचा अभ्यास सार्वजनिक करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष आजचा नाही. मोठे महामार्ग, धरणे, औद्योगिक वसाहती किंवा रेल्वेमार्ग उभारताना हा प्रश्न वारंवार समोर येतो. मात्र आधुनिक लोकशाहीत विकास म्हणजे लोकांच्या संमतीने आणि त्यांच्या सहभागाने घडणारी प्रक्रिया असली पाहिजे. प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न झाला, तर संघर्ष अटळ ठरतो.

सरकारने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. शक्य असेल तेथे मार्गाचे पुनर्नियोजन करून सुपीक जमिनी वाचविण्याचा प्रयत्न व्हावा. पर्यायी सरेखनाचा अभ्यास करावा. ज्या ठिकाणी भूसंपादन अपरिहार्य आहे, तेथे केवळ बाजारभावानुसार भरपाई न देता पुनर्वसन, रोजगार, कौशल्य प्रशिक्षण आणि दीर्घकालीन उपजीविकेची हमी यांचा समावेश असलेले सर्वसमावेशक पॅकेज दिले पाहिजे. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केल्याशिवाय कोणताही विकास प्रकल्प यशस्वी होऊ शकत नाही.

दुसरीकडे, शेतकरी संघटनांनीही केवळ विरोधाची भूमिका न घेता पर्यायी उपाय सुचविणे आवश्यक आहे. रेल्वे प्रकल्पामुळे भविष्यात संपूर्ण प्रदेशाच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळणार असेल, तर त्याचा व्यापक विचारही करावा लागेल. सार्वजनिक हित आणि वैयक्तिक हित यामध्ये समतोल राखण्याची जबाबदारी समाजातील सर्व घटकांची आहे.

रेल्वे विकासाच्या नव्या पर्वात महाराष्ट्र पुढे जात आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. मात्र विकासाचा रुळ शेतकऱ्यांच्या अश्रूंवरून जाऊ नये, हीदेखील तितकीच महत्त्वाची अट आहे. शासनाने संवाद, पारदर्शकता आणि न्याय्य पुनर्वसन यांवर भर दिला, तर रेल्वेचे रुळ केवळ शहरांना जोडणार नाहीत, तर सरकार आणि जनतेतील विश्वासाची दरीही भरून काढतील.

हजारो कोटींच्या विकास प्रकल्पांचे यश केवळ अर्थसंकल्पातील तरतुदींवर अवलंबून नसते; ते लोकांच्या विश्वासावरही तितकेच अवलंबून असते. त्यामुळे सरकारने रेल्वे प्रकल्पांचा वेग कायम ठेवताना भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता, योग्य मोबदला, पर्यायी सरेखनाचा गांभीर्याने विचार आणि शेतकऱ्यांशी सातत्यपूर्ण संवाद यांना प्राधान्य दिले पाहिजे. १.४२ लाख कोटींच्या रेल्वे गुंतवणुकीइतकीच महत्त्वाची गुंतवणूक म्हणजे शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणे होय. हाच समतोल महाराष्ट्राच्या रेल्वे विकासाला सर्वसमावेशक आणि शाश्वत ठरवेल.

# शिर्डीत श्री गुरुपौर्णिमा उत्सवाची उत्साहात सांगता



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थानच्या वतीने आयोजित श्री गुरुपौर्णिमा उत्सवाचा सांगता सोहळा आज विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी आणि मोठ्या देणगीने उत्साहात संपन्न झाला. उत्सवाच्या सांगता दिनी मुख्य धार्मिक विधींमध्ये, गुरुस्थान मंदिरात संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविद्य पत्नी वंदना गाडीलकर यांच्या हस्ते रुद्राभिषेक करण्यात आला, तर समाधी मंदिरात संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे व त्यांच्या सुविद्य पत्नी वैशाली दराडे यांनी श्रींची पाद्यपूजा केली.

यानंतर, श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपाच्या स्टेजवर सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत ह.भ.प. वेदश्री वैभव ओक (डोंबिवली, पूर्व) यांचा काल्याच्या कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कीर्तनानंतर समाधी मंदिरात श्री साईबाबांचे समकालीन भक्त तात्या पाटील कोते यांचे वंशज ऋतुराज निलेश कोते यांच्या हस्ते पारंपरिक दहीहंडी फोडण्यात आली. याच सांगता दिनाचे औचित्य साधून तामिळनाडू, चेन्नई येथील दानशूर साईभक्त आर. वेत्री सेल्वी अव्वल राज यांनी ४ लाख २० हजार ९८३ रुपये मूल्य असलेली ३२.०२० ग्राम वजनाची आकर्षक नक्षीकाम केलेली सुवर्ण साखळी श्रींच्या चरणी अर्पण केली. ज्याबद्दल संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या संपूर्ण सांगता सोहळ्याप्रसंगी मंदिर विभाग प्रमुख विष्णू थोरात, प्रभारी जनसंपर्क अधिकारी दीपक लोखंडे, मंदिर पुजारी, संस्थानचे कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओंकार स्वामी धाम येथे गुरुपौर्णिमा उत्सव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** बुधवार दि. २९ जुलै रोजी श्री श्री १००८ महामंडलेश्वर ओंकारगिरीजी महाराज (पंच दशनाम जुना आखाडा) पीठाधीश्वर तारा अघोरपिठ त्रंबकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर येथील ओंकार स्वामी धाम जानकी नगर या ठिकाणी गुरुपौर्णिमा हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच महाराष्ट्रातील विविध भागातून भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता झाली यावेळी श्रींचा अभिषेक व महाआरती संपन्न झाली आणि आणि दुपारी बारा वाजता श्री दत्तप्रभूंचे आगमन व भिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, दुपारी तीन वाजता गुरु मंत्राची दीक्षा अनेक भाविक भक्तांना श्री श्री १००८ महामंडलेश्वर ओंकार स्वामीजी यांचा हस्ते दीक्षा देण्यात आली. चार वाजता महायज्ञाचे होम हवन भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाले व सायंकाळी साडेसहा वाजता अध्यात्मिक नामस्मरण व नामजपाचे आयोजन करण्यात आले होते . त्यानंतर सायंकाळी सात वाजता श्रींची महाआरती संपन्न झाली व साडेसात वाजता गुरुपौर्णिमा निमित्ताने विविध भाविक भक्तांच्या उपस्थितीत गुरु पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांच्यासह ओंकार स्वामी धामचे विश्वस्त संदीप पाटील, चेतन पाटील, अतुल दवंगे अविनाश काळे, याविविध मान्यवरांनीही या कार्यक्रमांचा लाभ घेतला. त्यानंतर आलेल्या सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने भाविक भक्तांची दिवसभर दर्शनासाठी रीघ लागली होती.

## अण्णाभाऊ साठे



साहित्याच्या अंगणात या
अण्णांनी
ज्योत नवी
पेटविली
या अण्णांच्या
शाहिरीने
अशी क्रांती
उठविली
पृथ्वी शेषाच्या मस्तकी नाही
कामगारांच्या तळहाती आहे
अण्णा विन कुणी वाली नाही
अण्णांनी खळबळ उठवली
मजूर हमाल गिरणी कामगार
मुंबईत झाले सारे बेजार
कधी मोर्चा कधी धरणे
अण्णांनी रीघही दाखविली
जे जे भावले जीवाला चावले
लेखणी मधून तेच उतरले
थेट रशिया गाठविली
अशी शाहिरी फुलविली

**–कवी बाबासाहेब पवार**
**श्रीरामपूर**
**मो नंबर ८७ ९६ ७४ २२ ४३**

# 'वारी ही आत्मशुद्धी, समता आणि भक्तीचा अखंड प्रवाह' : महंत उद्धव महाराज मंडलिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** श्री क्षेत्र देवळाली प्रवरा ते तीर्थक्षेत्र पंढरपूर असा संपन्न झालेल्या श्री त्र्यंबकराज स्वामी पायी दिंडी सोहळ्याची गुरुवारी देवळाली प्रवरा येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात सांगता झाली. यानिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी वारकरी संप्रदायाचे महत्त्व, वारीचे आध्यात्मिक स्वरूप आणि संतांच्या विचारांची आजच्या काळातील आवश्यकता यावर प्रभावी निरूपण केले.



कीर्तनात बोलताना उद्धव महाराज म्हणाले, ''वारी ही केवळ पायी चालण्याची यात्रा नाही, तर मनातील अहंकार, मत्सर, लोभ आणि द्वेष दूर करून आत्मशुद्धी साधण्याचा मार्ग आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि वारकरी संतांनी दिलेला समता, प्रेम, सेवा आणि नामस्मरणाचा संदेश आजही समाजाला दिशा देणारा आहे. विठ्ठलभक्ती ही माणसाला माणुसकी शिकवते. वारीत प्रत्येक वारकरी हा समान असतो. जात, पात, श्रीमंती–गरीबी यापलीकडे जाऊन सर्वजण विठ्ठलाच्या चरणी एकरूप होतात, हाच वारकरी संप्रदायाचा खरा संदेश आहे.

कीर्तनानंतर उपस्थित हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी शिलाताई व सोन्याबापू दत्तात्रय जाधव यांच्या हस्ते संतपूजन करण्यात आले.

सहारा लॉन्स येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मंडळी, दिंडीसाठी मदत करणारे दानशूर मंडळी, देणगीदार, अन्नदाते तसेच भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेवासा पोलिसांचा दणका

## गंगापूरमधील सोन्याच्या अंगठीची चोरी; तीन तासांत आरोपी जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** गंगापूर येथील सराफ दुकानातून तब्बल १ लाख ७० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी चोरी करून पसार झालेल्या आरोपीला नेवासा पोलिसांनी अवघ्या तीन तासांत ताब्यात घेतले. चोरीची अंगठी विकण्याचा प्रयत्न करत असतानाच पोलिसांनी त्याचा डाव उधळून लावला.

पोलिसांच्या माहितीनुसार, असीम सादिक शेख (रा. प्रवरासंगम, ता. नेवासा) याने सोमवारी दुपारी गंगापूर येथील सराफ दुकानातून सुमारे २२ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरली आणि तेथून पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला.

दरम्यान, चोरी केलेली सोन्याची अंगठी विकण्यासाठी आरोपीने सराफ असोसिएशनच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर अंगठीचा फोटो पाठवल्याचे तपासात समोर आले. या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला आणि अवघ्या तीन तासांत त्याला ताब्यात घेतले.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

चोरी केल्यानंतर अंगठी विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला तीन तासांत पकडल्याने नेवासा पोलिसांच्या तत्पर कारवाईचे कौतुक होत आहे.

# शनिशिंगणापूर येथे अपघात वाहनाचे नुकसान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** शनिशिगंनापूरहुन संभाजीनगरकडे व संभाजी नगरहून शनिशिगंनापूरला येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाची धडक होऊन अपघात झाला आहे. यामध्ये भाविक किरकोळ जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे. वाहनाचेही नुकसान झाले आहे. अपघात झाला ते ठिकाण कॉर्नर स्वरूपाचे आहे. त्यात झाडी झुडपे असल्यामुळे अपघात झाला. त्यामध्ये पावसाची रिपरिप चालू असल्यामुळे वाहनाचा अचानक ताबा सुटून अपघात झाल्याने एक वाहन रस्त्यात आडवे तर दुसरे एक वाहन रस्त्याच्या खड्ड्यात गेल्याची घटना घडल्याने नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दुपारपर्यंत पोलीस ठाण्याला या अपघाताची माहिती न मिळाल्याने पोलीस प्रशासनाला सविस्तर खबर देता आली नाही. याबाबत पोलीस निरीक्षक दीपक धनवटे यांनी घटनास्थळी कर्मचारी पाठवून पाहणी व मदत करण्याचे सूचित केले.




# गुरुपौर्णिमेनिमित्त पूर्णवादी नागरी सहकारी बँकेत रक्तदान शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** प.पू. पूर्णवाद प्रणेते डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर आणि प.पू. पूर्णवाद वर्धिष्णू डॉ. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या जन्मतिथी व गुरुपौर्णिमेच्या पवित्र औचित्याने पूर्णवादी नागरी सहकारी बँक (बीड) शाखा संगमनेर यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प.पू. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर व प.पू. डॉ. विष्णू महाराज पारनेरकर यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी पुरोहित संघाचे अध्यक्ष नरेंद्रभाऊ जाखडी, प्रसिद्ध व्यापारी दिलीप पारख, क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष संजय क्षत्रिय, पेन्शनर्स संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर गोंटे , ज्येष्ठ गुरुबंधू उपासक व स्टेट बँक ऑफ इंडियाचे सेवानिवृत्त अधिकारी प्रकाश देशमुख तसेच सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात ना. सह. पतसंस्थेचे व्यवस्थापक प्रवीण मुळे उपस्थित होते.

''रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून रक्ताचा प्रत्येक थेंब गरजू रुग्णाला नवजीवन देऊ शकतो,'' या भावनेतून अनेक रक्तदात्यांनी शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला. उपस्थित मान्यवरांनी सर्व रक्तदात्यांच्या सेवाभावी वृत्तीचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

शिबिराच्या यशस्वी आणि उत्कृष्ट आयोजनाबद्दल अर्पण रक्तपेढीच्या प्रतिनिधी सौ. कल्पना सोनवणे व सौ. कडलग यांच्या हस्ते पूर्णवादी नागरी सहकारी बँकेचा विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी अर्पण रक्तपेढीचे प्रतिनिधी, बँकेचे शाखाधिकारी मुरलीधर देशमुख, शांताराम कांगुणे, बँकेचे कर्मचारी प्रवीण आमलेकर, सुरेश राजहंस यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी शाखाधिकाऱ्यांनी उपस्थितांचे व रक्तदात्यांचे आभार व्यक्त केले.



# गणोरे पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्र दीपक यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे** - गणोरे (ता- अकोले) येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्र दीपक यश मिळत यशाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्य २०२६ या शिष्यवृत्ती परीक्षेत वेदांत विवेक आंबरे-२१८, आरोही दत्तात्रेय आहेर-१९४ आवणी अविनाश आहेर- १७८, अनन्या सतीश दातीर- १६८, श्रेयांश योगेश आंबरे - १६२, आराध्या नितीन ढोबळ - १४८, स्वरा गोरक्षनाथ आहेर - १३० हे सात विद्यार्थी पात्र ठरले आहे. याची यशस्वी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख वैशाली पोखरकर यांनी शिष्यवृत्ती परिक्षा,मिशन आरंभ, मंथन परिक्षा तसेच एक्सलंट ओलंपियाड यासारख्या विविध परीक्षांना विद्यार्थ्यांना बसवून दररोज ज्यादा तास घेऊन मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक राजेश आरोटे, अश्विनी झिरमिटे, सुनयना वाकचौरे, वैशाली हासे, वैशाली कोंडार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, सरपंच, उपसरपंच व शिक्षण प्रेमी ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

# सावळीविहीरच्या उपसरपंचपदी दतात्रय आगलावे यांची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** राहाता तालुक्यातील सावळीविहीर बुद्रुक ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी दत्तात्रय जिजाबा आगलावे यांची निवड करण्यात आली आहे. विद्यमान उपसरपंच विकास जपे यांनी राजीनामा दिल्याने सदर पद रिक्त झाले होते. विकास जपे यांनी सुमारे साडे तीन वर्षे उपसरपंच पदी विराजमान होते.काल ग्राम विकास अधिकारी कार्ले याच्या निर्देशनानुसार निवड प्रक्रिया पार पडली.

उपसरपंच पदासाठी सरपंच ओमेश जपे यांच्या गटाकडून दत्तात्रय आगलावे यांच्या यांचा दाखल करण्यात आला होता त्यांचे विरोधात बाळासाहेब जपे यांचे कडून विकास जपे यांचा अर्ज दाखल करण्यात आला होता. निर्णय अधिकारी कार्ले यांनी सदस्याचे मतदान घेऊन सदर प्रक्रिया पार पाडली. यात सत्ताधारी ओमेश जपे यांचे उमेदवार दत्तात्रय आगलावे यांना १२ मते तर विकास जपे यांना ४ मते पडल्याचे कार्ले यांनी सांगितले. यावेळी नुतन उपसरपंच दत्तात्रय आगलावे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या निवड प्रक्रीये वेळी राहाता कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक शांताराम जपे. माजी सरपंच सोपानराव पवार, पोलीस पाटील सुरेश वाघमारे, सोसायटी चे अध्यक्ष कैलास सदाफळ, जिजाबा आगलावे, बापू जपे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगलावे यांच्या निवडीचे स्वागत : बाळासाहेब जपे राजकारणात शब्दाला महत्व असते आमच्या गटाला सुमारे साडे तीन वर्षे विकास जपे यांच्या रूपाने उपसरपंच पद मिळाले. त्याबद्दल मी समाधानी आहे. त्यांच्या निवडीमुळे गाव विकासासाच्या दिशेनं पाऊल टाकेल यांत शंका नाही. दिलेला शब्द पुर्ण केला - सरपंच ओमेश जपे गेल्या साडे तीन वर्षा पूर्वी ग्रामपंचायतची निवडणूक झाली होती, त्यामधे आमचे गटाला आठ सदस्य व ९ वा सरपंच असे बलाबल होते. त्यावेळी शांताराम जपे व स्व. रमेश आगलावे यांचे सुचनेवरून विकास जपे यांना अडीच वर्षे उपसरपंच केले. त्यावेळी दत्तात्रय आगलावे यांना पुढील अडीच वर्ष उपसरपंच करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यांना आज उपसरपंचपदी त्यांना विराजमान करून दिलेला शब्द पुर्ण झाल्याचे सरपंच ओमेश जपे म्हणाले.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# ‘गतीमान नागरी सेवा पुरस्कार’ प्रत्येक विभागाला मिळाला पाहिजे : आ. काळे

## कोपरगावात छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : सर्वाभिमुख नेतृत्व असलेले अजितदादा आज आपल्यात नाहीत. त्यामुळे राज्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. सातत्याने महाराष्ट्राच्या प्रगतीचा विचार करतांना त्यांची नेहमी अपेक्षा होती की, नागरिकांच्या अडचणी वेळेत सुटल्या पाहिजे आणि त्यासाठी आपले प्रशासन गतिमान असले पाहिजे. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ महायुती शासनाने त्यांच्या नावाने ‘गतिमान नागरी सेवा पुरस्कार’ देण्याचे जाहीर केले आहे. हा पुरस्कार प्रशासनातील प्रत्येक विभागाला मिळाला पाहिजे अशा पद्धतीने काम करा असे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.

कोपरगाव येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा जन्मदिवस व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त शुक्रवार (दि.३१) रोजी कोपरगावात महात्मा गांधी प्रदर्शन चॅरीटेबल ट्रस्ट हॉल येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.




आ. आशुतोष काळे पुढे म्हणाले की, शासनाकडून नागरिकांना लाभाचे वितरण वेळेत झाले पाहिजे किंवा शासनाच्या माध्यमातून नागरीकांच्या ज्या काही अडचणी असतील त्या अडचणी वेळेत सुटल्या पाहिजे अशी अपेक्षा नेहमी स्व. अजितदादांची होती आणि हीच अपेक्षा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पण आहे. स्व. अजितदादा हे हाडाचे शेतकरी आणि जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण असलेले दूरदृष्टीचे नेतृत्व होते. शेती, दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री, भाजीपाला, साखर कारखाने, सहकारी बँका, पतसंस्था, दूध संस्था आणि मार्केट कमिट्यांपासून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक पैलूचा त्यांचा अभ्यास दांडगा होता.

त्याचबरोबर नगर विकास, ग्रामविकास, सहकार यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांवरील त्यांचे प्रभुत्व आणि शहरी विकासाविषयीची त्यांची दूरदृष्टी उल्लेखनीय होती. कामाच्या बाबतीत स्वत:शिस्तप्रिय असल्यामुळे प्रशासनेही शिस्त पाळून नागरीकांचे प्रश्न वेळेत सोडविले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळे त्यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या गतिमान नागरी सेवा पुरस्काराचा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उद्देश लक्षात घेवून नागरीकांना उत्कृष्ट सेवा देण्याचे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे अतिशय उत्कृष्ठ पणे काम सुरु आहे.

राज्याचे महसूल मंत्री ना.चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी फेब्रुवारी महिन्यात सुरु केलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर हे अभियान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या संकल्पनेतून अतिशय यशस्वीपणे राबवीले जात आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या जास्तीत जास्त अडचणी कशा सोडवता येतील यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. प्रशासनाकडून जास्तीत जास्त काम मार्गी लावून घेण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. त्यामुळे नागरीकांना केवळ शिबिराच्या दिवशीच गतिमान सेवा न देता वर्षभर प्रशासनाचे काम गतिमान कसे राहील यासाठी सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सामुहिक प्रयत्न करावे. आणि शासनाच्या सर्व लाभाच्या योजनांचा सगळ्यात जास्त लाभ कोपरगाव मतदार संघातील पात्र आणि गरजू नागरीकांना कसा मिळवून देता येईल यासाठी प्रयत्न करावे अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी अपर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे, तहसीलदार महेश सावंत, कोपरगाव शहर पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे, गटविकास अधिकारी स्वप्निल वाळुंज, सहाय्यक गटविकास अधिकारी संदीप दळवी, नगरपरिषद मुख्याधिकारी अजित निकत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी महेबूब शेख, नायब तहसीलदार सौ.प्रफुल्लिता सातपुते, चंद्रशेखर कुलथे, गटशिक्षणाधिकारी शबाना शेख, सहकारी संस्था सहाय्यक निबंधक संदीपकुमार रुद्राक्ष, भूमी अभिलेख उपअधीक्षक राजेंद्र खरोटे, बालविकास प्रकल्प अधिकारी रुपाली धुमाळ आदींसह सर्व विभागांचे शासकीय अधिकारी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीणजी शिंदे, संचालक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व संलग्न संस्थांचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, लाभार्थी व नागरिक उपस्थित होते.

# द • ख • ल

## तरुणीची फसवणूक व अत्याचाराची तक्रार; सहा जणांविरुद्ध गुन्हा

**सोनई** : एका २१ वर्षीय तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून सोनई पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध फसवणूक, धमकी, विनयभंग, लैंगिक अत्याचार व इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२४ ते २१ जुलै २०२६ या कालावधीत सोनई, ता.नेवासा,अहिल्यानगर शहर, तसेच पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी संबंधित अत्याचाराचा प्रकार घडल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. तसेच फिर्यादीची इच्छा नसतानाही तिला धमकावून लग्न केले. तसेच आरोपीने वेळोवेळी बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा, छायाचित्रांचा गैरवापर करून धमकावल्याचा तसेच इतर आरोपींनीही धमक्या देऊन त्रास दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अनिल मोरे करीत आहेत.

## गडचिरोलीच्या व्यापाऱ्याचा मका श्रीरामपूर तालुक्यात चोरीला, ११ टन मका गायब

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भोकर येथे दि.१४ ते दि.२२ जुलै दरम्यान अज्ञात चोरट्यानी एका गोदामाचे कुलूप तोडून १ लाख ७४ हजार ३७५ रुपये किमतीचा ११ टन मका चोरून नेला.गडचिरोलीचे धान्य व्यापारी तुळशीदास लाकडे यांनी कंपनीने नाकारलेला ११ टन मका ओळखीच्या ट्रान्सपोर्टधारकाच्या मध्यस्थीने भोकर येथील संतोष धिरडे यांच्या गोदामात सुरक्षित ठेवला होता. दि.२२ जुलै रोजी हा माल दुसऱ्या व्यापाऱ्याला विकण्यासाठी ट्रान्सपोर्टरला पाठवले असता गोदाम मालकाने चोरी झाल्याचे सांगितले. गोदामाचे शटर न तोडता केवळ कुलूप उघडून माल गायब केल्याने पोलिसांना संशय आहे की, हा माल आजूबाजूलाच कोणालातरी विकण्यात आला असावा. लाकडे यांच्या तक्रारीवरून श्रीरामपूर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहेत.

## नजीक चिंचोली येथे आषाढी वारी सोहळ्याची सांगता



**नेवासा** : तालुक्यातील नजीक चिंचोली येथे जगदंबा खडेश्वरी माता आषाढी पायी दिंडी सोहळयाची संतपूजन व देवस्थानचे प्रमुख महंत हभप गणेशानंद महाराज यांच्या किर्तनाने गुरुपौर्णिमेला सांगता करण्यात आली. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने सकाळी ६ वाजता जगदंबा खडेश्वरी देवीस महाअभिषेक घालण्यात आला.त्यानंतर गुरुपूजन,होम हवन व महाआरती करण्यात आली.गुरुपौर्णिमा उत्सव व आषाढी वारी सांगता प्रसंगी सकाळी ९ ते ११ यावेळेत आदिशक्ती जगदंबा खडेश्वरी देवस्थानचे महंत श्री गणेशानंदजी महाराज यांचे गुरू महिमा व गुरुशिष्य परंपरा यावर किर्तन झाले.

किर्तन सोहळयाच्या प्रसंगी महंत श्री गणेशानंद महाराज यांच्या हस्ते पंढरपूर आषाढी पायी वारी दिंडी सोहळयात योगदान देणाऱ्या दात्यांचा सत्कार श्रीफळ प्रसाद देऊन करण्यात आला. गुरुपौर्णिमा उत्सवा निमित्त झालेल्या किर्तन सोहळयाच्या प्रसंगी भाकचंद महाराज पाठक,कारभारी महाराज चौधुले,बाबासाहेब महाराज धाडगे,शिवाजी महाराज पाठक,नजीक चिंचोलीचे सरपंच भाकचंद चावरे, बाभुळखेड्याचे सरपंच ज्ञानेश्वर औताडे,युवा उद्योजक शिवाभाऊ पाठक,बाबासाहेब महाराज धाडगे यांच्यासह नजिक चिचोंली व बाभुळखेडा गावातील भजनी मडंळ, ग्रामस्थ, तरुण व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनई परिसरात दिवसभर रिमझिम; पिकांना नवसंजीवनी

**सोनई** : सोनईसह परिसरात गुरुवारी रात्रीपासून सुरू झालेल्या रिमझिम पावसाने शुक्रवारी दिवसभर हजेरी लावली. राज्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस सुरू असताना सोनई परिसरात झालेल्या या सततच्या बुरबुर पावसामुळे खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या पावसाचा कपाशी, ऊस, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, उडीद तसेच चारा पिकांना चांगला फायदा झाला आहे. पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेला ओलावा मिळाल्याने शेतीतील मशागतीच्या कामांनाही गती मिळणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. दरम्यान, दिवसभर सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर काही प्रमाणात परिणाम झाला. वृत्तपत्र विक्रेत्यांसह अनेकांचे कामकाज विस्कळीत झाले. अत्यावश्यक कामांसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी रेनकोट व छत्रीचा वापर करत पावसातच धावपळ केल्याचे चित्र परिसरात पाहायला मिळाले.

# कापूस उत्पादकांना विद्यापीठ शास्त्रज्ञांचे बांधावर मार्गदर्शन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिति केंद्रांतर्गत राहुरी तालुक्यातील कोंढवड येथे शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बांधावर जाऊन पीक व्यवस्थापनाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, कापूस सुधार प्रकल्पाचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते, प्रा. अन्सारखान अत्तार, डॉ. सुनील अडांगळे तसेच कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते. डॉ. पंडित खर्डे यांनी शेतकरी-शास्त्रज्ञ मंचाच्या कार्याची माहिती देत, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मंच कार्यरत असून शेतकऱ्यांच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगितले. डॉ. नंदकुमार भुते यांनी कापूस पिकातील उत्पादनवाढीसाठी लागवडीनंतर ४५ दिवसांनी खालच्या फांद्या काढणे, ७५ ते ८० दिवसांनी शेंडी खुडणे, संतुलित खत व्यवस्थापन व एकात्मिक कीड नियंत्रणावर भर देण्याचे आवाहन केले. फुले सुपर बायोमिक्स, फुले ग्रेड सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच कामगंध व चिकट सापळ्यांचा वापर करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी शास्त्रज्ञांनी शेतभेट देत शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. या मार्गदर्शनाचा कोंढवड येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ झाला.

# आदर्श विद्यालयच्या मुख्यध्यापक पदी अशोक दराडे यांनी स्वीकारला पदभार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : येथील आदर्श विद्यालयात २५ वर्षापासून शिक्षक म्हणून कार्यरत असलेले अशोक सोन्याबापु दराडे, (रा.वंजारवाडी) येथील मूळनिवासी यांची पदोन्नती होत, शेवगाव येथील आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी निवड करण्यात आली. पानसवाडी येथील श्री हनुमान ग्रामीण विकास व संशोधन मंडळ प्रतिष्ठानच्या संस्थापक माजी खासदार स्वर्गीय तुकाराम पाटील गडाख यांच्या शिक्षण संस्था शेवगाव येथील विद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी योग्य अशी नियुक्ती करण्यात आली आहे. दराडे यांचा भरदार आवाज, शिस्तप्रिय शिक्षक म्हणून संस्काराचे धडे देणारे प्रचंड दबदबा व आदरयुक्त असलेले व्यक्तिमत्त्वाची त्यांची ओळख असून या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जयश्रीताई गडाख सचिव रविराज पाटील गडाख, उद्योजक शिवाशेठ बाफना,माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब खेसमाळस्कर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय कल्हापुरे, मुख्याध्यापक सुभाष पवार, वंजारवाडीचे सरपंच महादेव दराडे,अरुण चांदघोडे,प्रमोद घावटे अन्य पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# कामिका एकादशी यात्रेसाठी प्रशासन सज्ज

## भाविकांना उत्कृष्ट सुविधा देण्यावर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या कामिका एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करून भाविकांना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केले. ९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या यात्रेच्या नियोजनासाठी संत ज्ञानेश्वर मंदिर परिसरात मंदिर विश्वस्त मंडळ, विविध शासकीय विभागांचे अधिकारी, सेवेकरी, दिंडी प्रतिनिधी व पत्रकार यांच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते. धाकटी एकादशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या यात्रेसाठी सुमारे अडीचशे दिंड्या आणि सात ते आठ लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. यामुळे गर्दी नियोजन, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा व आपत्कालीन सुविधांबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. यंदा भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पैस खांबाचे दर्शन मंदिराबाहेरून देण्यात येणार असून, प्रवेशद्वार व सभागृहात चांदीच्या मूर्ती आणि पादुकांचे स्वतंत्र दर्शन उपलब्ध करण्यात येणार आहे. यात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व दिंड्यांची नोंदणी करून प्रत्येक दिंडीचा मानाच्या नारळाने सत्कार केला जाणार आहे. बैठकीला मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त, तहसीलदार, पोलीस, नगरपालिकेसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच कामिका एकादशीदिनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शालिनीताई विखे पाटील दर्शनासाठी उपस्थित राहणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

# नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी ९ ऑगस्टला चक्काजाम

## आ. सत्यजीत तांबे यांची जनआंदोलनाची हाक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गाच्या मागणीसाठीचा लढा आता निर्णायक टप्प्यात पोहोचला असून, ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता नाशिक-पुणे महामार्गावर विविध ठिकाणी एकाच वेळी चक्काजाम जनआंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा आमदार सत्यजीत तांबे यांनी केली. केंद्र सरकारचे या महत्त्वाच्या प्रकल्पाकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तांबे म्हणाले, हा लढा कोणत्याही पक्षाचा किंवा नेत्याचा नसून सामान्य नागरिकांचा आहे. रेल्वेसारखे प्रकल्प शतकातून एकदाच उभे राहतात. त्यामुळे भविष्यातील पिढ्यांचा विचार करून सरकारने नफा-तोट्याचा विचार बाजूला ठेवत रेल्वे मार्गाला मंजुरी द्यावी. सध्या नाशिक-पुणे प्रवासासाठी वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरवस्था आणि अपघातांमुळे सहा ते सात तास लागत असल्याने विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक व व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या रेल्वेमार्गामुळे सिन्नर, संगमनेर, अकोले, नारायणगाव, मंचर, राजगुरूनगर, चाकण आदी भागांच्या विकासाला चालना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण, राजगुरूनगर, मंचर, नारायणगाव, आळेफाटा, घारगाव, संगमनेर, सिन्नर आणि नाशिक येथे सकाळी ९ वाजता आंदोलन होणार आहे. सर्वांनी राजकीय मतभेद विसरून या जनआंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहनही तांबे यांनी केले.

# त्रिवेणीश्वर देवस्थानच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांनी गुरुपौर्णिमा साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**नेवासा** : प्रभू रामचंद्राच्या वास्तव्याने पुनित झालेल्या नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र त्रिवेणीश्वराच्या पावन भूमीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली यावेळी हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने त्रिवेणीश्वर देवस्थान प्रमुख महंत गुरुवर्य स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते सकाळी ७ ते ८ या वेळेत अजानबाहू भक्त प्रल्हाद महाराज यांच्या समाधीचे व गुरुपादुकांचे पुजन करण्यात येऊन स्वयंभू त्रिवेणीश्वर शिवलिंगास अभिषेक घालण्यात आला.या निमित्ताने सकाळ पासूनच भाविकांनी दर्शनासाठी येथे गर्दी केली होती.यावेळी सेवेकरी अविनाश उभेदळ व ज्ञानेश्वर पंडित यांच्या वतीने संतपूजन करण्यात आले तर उपस्थित भाविकांनी अजानबाहू योगीराज भक्त प्रल्हादगिरी महाराज यांच्या समाधीसह स्वयंभू त्रिवेणीश्वराचे दर्शन घेतले. भक्त मंडळाचे सेवेकरी अजित गुगळे व अभय गुगळे यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सव प्रसंगी पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख प्रभाकरराव शिंदे, बाळासाहेब शिंदे,संतसेवक किशोरभाऊ जोजार, सुरेशनगरचे माजी सरपंच पांडुरंग उभेदळ,सरपंच कल्याणराव उभेदळ,उद्योजक सुरेशराव उभेदळ, भिवाजीराव आघाव,जनार्धन पटारे, विठ्ठलराव पाषाण,अण्णासाहेब जावळे,कॉन्ट्रॅक्टर महेंद्र पवार,उद्योजक बाळासाहेब साळुंके,ग्रामपंचायत सदस्य किरण जाधव,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,प्रमोद महाराज अरोकडे,कृष्णा महाराज बोबडे,विकास महाराज जाधव, तुषार महाराज, बी के पवार,संतसेवक मनोहर जाधव गोरखभाऊ गुंजाळ यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने दिवसभर गुरूदर्शन सोहळा सुरूच होता यावेळी स्वयंभू त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरी बाबा यांचे उपस्थित भाविकांनी संतपूजन केले.या निमित्ताने सायंकाळी ७ ते ९ यावेळेत देवस्थानचे महंत स्वामी श्री रमेशानंदगिरीजी महाराज यांचे हरिकिर्तन झाले.

# चंदनापुरी घाटात थोरात कारखान्याकडून वृक्षारोपण

## दंडकारण्य अभियानाला बळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने दंडकारण्य अभियानांतर्गत चंदनापुरी घाट परिसरात रिमझिम पावसात उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि त्यांचे संगोपन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.ड

ॉ. तांबे म्हणाले, निसर्गाने मानवाला भरभरून दिले असून आता माणसानेही निसर्गाचे ऋण फेडण्याची वेळ आली आहे. ग्लोबल वॉर्मिंग, दुष्काळ, अतिवृष्टी आणि वाढते प्रदूषण या समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन करणे आवश्यक आहे. कोरोना काळात ऑक्सिजनचे महत्त्व जगाने अनुभवले असून पर्यावरण संरक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी प्रकल्प प्रमुख दुर्गाताई तांबे यांनी दंडकारण्य अभियानामुळे राज्यभर पर्यावरण संवर्धनाची जनजागृती झाली असून महिलांचाही मोठा सहभाग लाभल्याचे सांगितले.

कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले यांनी चंदनापुरी घाटासह रस्त्याच्या दुतर्फा फुलझाडांची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती दिली. कार्यक्रमास कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, प्रा. बाबा खरात, विनोद हासे, विजय राहणे, गुलाबराव कडलग, विलास शिंदे, रामनाथ कुटे, सतीश वर्पे, दिलीप नागरे यांच्यासह संचालक, अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय कोपरगांव
क्र. कावि/फौजदारी/८०/२०२६
कोपरगांव दि. २८/०७/२०२६

कोपरगांव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात.
ओवेश सिकंदर खान, रा. कुराण,
ता. संगमनेर जि. अहिल्यानगर
विरुध्द
निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगरपरिषद कोपरगांव,
ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

ज्याअर्थी, अर्जदार ओवेश सिकंदर खान रा. कुराण ता. संगमनेर जि अहिल्यानगर जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार नामे ओवेश सिकंदर खान यांची आई या दिनांक. ०८/१२/१९८८ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे प्रसुत होऊन अर्जदार नामे ओवेश सिकंदर खान यांचा जन्म झाला आहे. सदर अर्जदार यांचे जन्माची नोंद मुख्याधिकारी नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर यांचेकडे अनावधानाने करावयाची राहुन गेली आहे. तथापी अर्जदार यांचे जन्माची नोंद जन्म मृत्यु रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे. कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये, अर्जदार यांचे जन्म दिनांक. ०८/१२/१९८८ रोजी मौजे. कोपरगांव ता. कोपरगांव येथे झाला आहे. अर्जदार यांचे जन्माची नोंद मुख्याधिकारी नगरपरिषद कोपरगांव ता. कोपरगांव जि. अहिल्यानगर, येथे होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे. कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालनार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नाम्याने घेण्यात यावी, कळावे.

आज दि. २८/०७/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

शिक्का

**हुकूमावरुन**
**तहसिलदार कोपरगांव**

दिनांक : ३०.०७.२०२६

## सार्वजनिक नोटीस

गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील सर्व्हे नंबर १४०/८०/३/२ च्या साठेखत (Agreement to Sale) १६९८/२०१७ आणि खरेदीखत (Sale Deed) २७८९/२०१७ बाबत.

या नोटीशीद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, मौजे गुंजाळवाडी, तालुका संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर येथील एकूण क्षेत्रफळ १/२ आर असलेल्या, सर्व्हे नंबर १४०/८०/३/२ या मालमत्तेचे दुय्यम निबंधक कार्यालय, संगमनेर-२ येथे नोंदणीकृत झालेले मूळ खरेदीखत (दस्तऐवज साठेखत १६९८/२०१७आणि खरेदीखत २७८९/२०१७) गहाळ झाले असून ते सापडत नाही. सदर मालमत्ता ही कांता गणपतसिंग चंदेल यांच्या मालकीची आहे. मूळ साठेखत आणि खरेदीखत हे पूर्वीचे मालक बेबीताई दत्तात्रय सोनावणे आणि लताबाई म्हातू हजारे यांच्या दरम्यान निष्पादित (executed) करण्यात आले होते. सदरचे मूळ दस्तऐवज गहाळ झाल्याबाबतची पोलीस तक्रार माझे अशील (client) पप्पू मोहन सिंग यांनी दिनांक २८.०७.२०२६ रोजी संगमनेर पोलीस ठाण्यात नोंदवली आहे.

जर कोणाला सदर मूळ दस्तऐवज सापडल्यास, कृपया ते खाली नमूद केलेल्या पत्त्यावर परत करावे. तसेच, जर कोणत्याही व्यक्तीचा, बँकेचा किंवा वित्तीय संस्थणाचा सदर मालमत्तेवर गहाणखत, बोजा, देणगी (gift), भाडेपट्टा (lease), वारसाहक्क, विक्री किंवा साठेखताद्वारे कोणताही दावा, आक्षेप किंवा अधिकार असेल, तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आपला आक्षेप लेखी स्वरूपात, आवश्यक पुराव्यांच्या कागदपत्रांसह खालील पत्त्यावर सादर करावा.

माझे अशील, पप्पू मोहन सिंग, सदर मालमत्ता खरेदी करण्यास आणि त्यावर कर्ज सुविधा घेण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे, जर विहित मुदतीत कोणतेही आक्षेप किंवा दावे प्राप्त झाले नाहीत, तर सदर मालमत्ता निर्वेध, विक्रीयोग्य आणि सर्व प्रकारच्या बोजांपासून मुक्त आहे असे गृहीत धरले जाईल. त्यानंतर माझे अशील खरेदीखत आणि कर्ज प्रक्रियेसाठी पुढील कार्यवाही करतील आणि यानंतर आलेला कोणताही दावा किंवा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

**DV KUNDE ASSOCIATES**
2nd Floor Shamchandra Complex, Mhasoba Chauk,
(above Maharastra Gramin Bank) Vaijapur Tq.
Vaijapur Dist. Chatrapati Sambhajinagar - 433701
Mail - advkunde@Gmail.Com , Mo. 9960738444,

## पान १ वरुन

### पुण्यात रॅगिंग गँगचा धुमाकूळ

सांगून तन्मय वसतिगृहातून बाहेर पडला. पुणे रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्हीत तो सोलापूरकडे जाणाऱ्या रेल्वेत चढताना दिसला; मात्र त्यानंतर त्याचा मोबाईल बंद झाला आणि अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी महाविद्यालयाने सहा सदस्यीय समिती नियुक्त केली असून तपास सुरू आहे. यापूर्वीही बीजे मेडिकलमध्ये रॅगिंगच्या घटना समोर आल्या असून मागील वर्षी तीन निवासी डॉक्टरांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या घटनेमुळे वैद्यकीय महाविद्यालयांतील रॅगिंगचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---

### पाकिस्तानला जाब विचारा

केला असून, बाहेरील रहिवाशांसाठी राखीव जागांच्या माध्यमातून पाकिस्तान सरकार स्वतःच्या पसंतीचे सरकार सत्तेत आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप 'जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी'ने केला आहे. गेल्या दोन महिन्यांपासून या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहेत.

दुसरीकडे, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी आंदोलकांची तुलना भारतासारख्या शत्रूंशी करत कारवाईचे समर्थन केले असून आंदोलकांशी कोणतीही चर्चा होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. या घडामोडींमुळे पीओकेतील मानवी हक्क, लोकशाही प्रक्रिया आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंता व्यक्त केली जात असून, भारतानेही या प्रकरणावर जगाचे लक्ष वेधण्याचे आवाहन केले आहे.

---

### राहुरीत अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीची कारवाई

कंपनीचा टेम्पो (क्र. एमएच-०४-सीयू-७४१९) तसेच २० हजार रुपयांची वाळू असा एकूण ५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८४६/२०२६ बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, अशोक लिपणे, बाळासाहेब गुंजाळ, रोहित मिसाळ, बाळासाहेब नागरगोजे, विजय ठोंबरे, सोमनाथ झांबरे आणि रणजीत जाधव यांच्या पथकाने पार पाडली. जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधातील कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

---

### धमकीप्रकरणी दिपके यांनी सत्य समोर आणावे

माध्यमांशी संवाद साधताना विखे पाटील म्हणाले की, अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी सरकारने सुरू केली आहे. स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असून, मराठा विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती देण्याचा निर्णयही अमलात आणला जात आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीने ५८ लाख नोंदी शोधून काढल्या असून, त्यापैकी निम्म्याहून अधिक दाखल्यांचे वितरण झाले आहे. आंदोलनातील ९६१ पैकी ८३१ गुन्हे मागे घेण्यात आले असून, ३०९ आंदोलनकर्त्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य देण्यात आले आहे. तसेच १,५५३ कर्मचाऱ्यांना नियमित करण्यात आले असून, 'सारथी' संस्थेच्या विविध योजनांचाही विस्तार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, केंद्र सरकारने आंदोलनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहत परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले असून, नंदन निलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय टास्कफोर्स स्थापन करण्यात आली आहे. अभिजित दिपके यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना विखे पाटील म्हणाले की, त्यांनी कोणाच्या दबावाला बळी न पडता धमकी अथवा ऑफर देणाऱ्यांची माहिती सार्वजनिक करावी.

---

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची बैठक आटोपली...

पडताळणीनंतर शुक्रवारी सापळा रचण्यात आला. बैठक संपल्यानंतर लखमवाड यांनी तक्रारदाराला त्यांच्या निवासस्थानी बोलावले. सायंकाळी लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या ४५ लाख रुपयांपैकी ५ लाख रुपये खऱ्या नोटांच्या स्वरूपात, तर ४० लाख रुपये डमी (मनोरंजन बँक) नोटांच्या स्वरूपात होते. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून एसीबीच्या अधीक्षक माधुरी कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

---

### ४.५० लाख कोटींच्या विकास पॅकेजला केंद्राचा हिरवा कंदील!

सांगितले आहेत. सौर प्रकल्पांसाठी स्वतंत्र जमीन संपादित करण्याची गरज भासणार नाही. जलाशयांवरील पाण्याचे बाष्पीभवन कमी होईल, त्यामुळे सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध राहील. फ्लोटिंग सोलर यंत्रणांचे उत्पादन देशातच करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. या प्रकल्पामुळे सुमारे १७ हजार नव्या रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तसेच कार्बन उत्सर्जनातही लक्षणीय घट होण्यास मदत होईल.

# विकासाची वाटचाल थांबणार नाही

## जनतेच्या विश्वासावर पुढेही काम करणार :आ.खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** ''जोपर्यंत माझ्या पाठीशी सामान्य जनता आहे, तोपर्यंत मला कोणाचीही भीती नाही. जनतेने दिलेल्या विश्वासाच्या बळावर संगमनेर तालुक्यात विकासाची वाटचाल सुरू असून ती यापुढेही अधिक वेगाने सुरू राहील,'' असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महा महसूल समाधान शिबिरात ते बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रदीप वट्टमवार, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके, सहाय्यक वनसंरक्षक अमरजीत पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमात महसूल, कृषी, पंचायत समिती व वन विभागाच्या विविध योजनांतील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

**विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा**

न्यायालयाने केवळ याचिका सुनावणीसाठी स्वीकारली असून काही जण त्याचा चुकीचा अर्थ काढून पुन्हा आमदार किंवा मुख्यमंत्री होण्याची स्वप्ने पाहत आहेत, अशी टीका आमदार खताळ यांनी केली. ''जनतेच्या न्यायालयात माझा विजय झाला आहे. न्यायप्रविष्ट प्रकरणातही सत्याचाच विजय होईल, याची मला खात्री आहे. माझ्यावर करण्यात येणारे आरोप निराधार असून संगमनेरची सामान्य जनता माझ्या पाठीशी असल्याने मला कोणतीही चिंता नाही,'' असे त्यांनी म्हटले.

**प्रशासनाचा दावा**

प्रांताधिकारी अरुण उंडे यांनी सांगितले की, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तालुक्यातील १४ महसूल मंडळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महा महसूल समाधान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरांद्वारे सुमारे १० हजार लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

आ. खताळ म्हणाले की, संगमनेरमध्ये आता नागरिकांची कामे वेळेत होत असून सरकारी कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांनाही सन्मानाची वागणूक मिळत आहे. शासनाच्या विविध सेवा प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याने प्रशासनावरील विश्वास वाढला आहे.

तालुक्यातील १४ महसूल मंडळांमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष अभियानांतर्गत १ हजार ७९७ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. ३८० सातबारा उताऱ्यांमध्ये दुरुस्ती करण्यात आली असून सुमारे ४ हजार ५०० डिजिटल सातबारे वितरित करण्यात आले. तसेच १ हजार ७०० महसूल प्रमाणपत्रे देण्यात आली असून एक खिडकी योजनेअंतर्गत १ हजार ७० अर्ज निकाली काढण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

तुकडाबंदी कायद्याचा प्रश्न विधानसभेत सातत्याने मांडल्यानंतर शासनाने सकारात्मक निर्णय घेतला असून राज्यातील सुमारे ५० लाख नागरिकांना त्याचा लाभ झाल्याचे खताळ यांनी सांगितले. शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी शासन विविध योजना प्रभावीपणे राबवत असून पीएम किसान, कृषी यांत्रिकीकरण, सौर कृषी पंप, कृषी अवजारे व विविध अनुदान योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. तालुक्यातील ५९ हजारांहून अधिक शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेत असल्याची माहितीही त्यांनी दिली.




तळेगाव परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी भोजापूर धरण, सिंचन योजना व कालव्यांच्या दुरुस्तीची कामे सुरू असल्याचे सांगत, कौठे मलकापूर परिसरातील एमआयडीसी उभारणी अंतिम टप्प्यात असून त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. नाशिक-पुणे रेल्वेमार्ग संगमनेरमार्गे व्हावा यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

''मी एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. जनतेने माझ्यावर ठेवलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. शासनाच्या योजना प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवून तालुक्याच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहीन,'' असे खताळ यांनी शेवटी सांगितले.

---

## धनादेश अनादरण प्रकरणी आरोपीस ३ महीने कारावास व तीन लाख रुपये दंडाची शिक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** व्यवसायासाठी हातउसने घेतलेल्या तीन लाख रुपयांच्या परतफेडीसाठी दिलेले धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी वैजापूर येथील न्यायालयाने आरोपीस तीन महिने सश्रम कारावास व तीन लाख २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी डी. एस. पिसाळ यांनी हा निकाल दिला.

शिवूर येथील व्यापारी महावीर दिपचंद चुडीवाल यांनी योगेश आसाराम जाधव (रा. शिवूर, ता. वैजापूर) यास व्यवसायासाठी मालाची बुकिंग करण्यासाठी ७ डिसेंबर २०२३ रोजी विश्वासापोटी तीन लाख रुपये हातउसने दिले होते. ठरलेल्या मुदतीत रक्कम परत न केल्याने आरोपीने दोन लाख व एक लाख रुपयांचे असे दोन धनादेश फिर्यादीला दिले. मात्र, बँक ऑफ महाराष्ट्र, शिवूर शाखेत धनादेश सादर केल्यानंतर खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने दोन्ही धनादेश अनादरित झाले.

यानंतर फिर्यादीने ॲड. एस. एस. ठोळे यांच्या मार्फत आरोपीस कायदेशीर नोटीस पाठविली. तरीही आरोपीने रक्कम अदा न केल्याने चलनक्षम दस्तऐवज कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत वैजापूर न्यायालयात दावा दाखल करण्यात आला.



प्रकरणातील पुरावे, साक्षी आणि युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस तीन महिने सश्रम कारावास, तीन लाख २० हजार रुपये दंड व दंडाची रक्कम एका महिन्यात फिर्यादीस अदा करण्याचे आदेश दिले. आदेशाचे पालन न केल्यास अतिरिक्त १५ दिवसांचा सश्रम कारावास भोगावा लागणार आहे. या प्रकरणात फिर्यादीतर्फे ॲड. एस. एस. ठोळे व ॲड. आकाश ठोळे यांनी बाजू मांडली.

---

## खत दुकानावर अज्ञाताचा डल्ला

### ६० गोण्या लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील घायगाव शिवारातील लक्ष्मीनारायण खत दुकानावर अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी करत सुमारे ५० ते ६० खताच्या गोण्या लंपास केल्या. विशेष म्हणजे, चोरीचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. मात्र, पुरावे नष्ट करण्यासाठी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे आणि डीव्हीआरही सोबत चोरून नेल्याने या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मीनारायण खत दुकानाचे संचालक प्रफुल सवई हे शुक्रवारी सकाळी सुमारे नऊ वाजता नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले. त्यावेळी दुकानाच्या मागील बाजूचे पत्रे कापलेले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संशय आल्याने त्यांनी आत जाऊन पाहणी केली असता दुकानातील विविध प्रकारच्या खताच्या अंदाजे ५० ते ६० गोण्या चोरीला गेल्याचे आढळून आले.

दुकानात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये चोरट्यांची संपूर्ण हालचाल कैद झाली होती. मात्र, पोलिसांना कोणताही पुरावा मिळू नये, यासाठी चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे आणि डीव्हीआरदेखील सोबत नेल्याचे उघड झाले. त्यामुळे ही चोरी पूर्वनियोजित असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसराची पाहणी केली असून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे. चोरीला गेलेल्या खताची नेमकी किंमत आणि इतर नुकसानीचा तपशील समजू शकले नाही.

ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरातील व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी हंगाम सुरू असताना खताची चोरी झाल्याने शेतकऱ्यांनाही फटका बसण्याची शक्यता आहे.

---

## धारदार शस्त्राने हल्ला, एक जखमी, संशयिताविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील येवले आखाडा येथील इरिगेशन कॉलनी परिसरात किरकोळ वादातून एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात एकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनबोध रामानंद शर्मा (वय ३८, रा. इरिगेशन कॉलनी, येवले आखाडा, ता. राहुरी) हे शुक्रवारी रात्री सुमारे ९ वाजता त्यांच्या घरासमोर असताना, आदित्य गोरख खंडीझोड (रा. येवले आखाडा, ता. राहुरी) हा तेथे आल्याचा आरोप आहे. त्याने फिर्यादीस शिवीगाळ करून दमदाटी केली तसेच धारदार शस्त्राने डाव्या हाताच्या बोटावर वार करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११८(१), ३५१(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

---

### गंगापूर शहरातील घरकुल लाभार्थ्यांना

## मोफत वाळू उपलब्ध करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर:** आमदार प्रशांत बंब यांच्या सूचनेनुसार शहरी भागातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत बाळू उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेविका पल्लवी शिरसाठ व आबासाहेब शिरसाठ यांनी तहसीलदार यांच्याकडे मागणी करून ही अद्याप पर्यंत या लाभार्थ्यांना वाळू देण्यात आली नसुन

गंगापूरप्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत गंगापूर नगरपरिषद हद्दीतील मंजूर लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेले वाळू वितरणाचे टोकन तात्काळ उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी गंगापूर नगर परिषदेच्या नगरसेविका पल्लवी आबासाहेब शिरसाठ व श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे सचिव आबासाहेब शिरसाठ यांनी आमदार प्रशांत बंब व तहसीलदार यांच्याकडे निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी वाळू वितरणाचे टोकन देण्यात येत आहेत. मात्र, शहरी भागातील म्हणजेच गंगापूर नगरपरिषद हद्दीतील मंजूर लाभार्थ्यांना अद्याप वाळू वितरणाचे टोकन मिळालेले नाहीत.

या पार्श्वभूमीवर मा. आमदार प्रशांत बंब यांच्या शिफारशीनुसार शहरी भागातील पात्र लाभार्थ्यांनाही ग्रामीण भागाप्रमाणेच मोफत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरी भागातील अनेक लाभार्थ्यांची घरकुल बांधकामे वाळूअभावी रखडली असून त्यांना आर्थिक तसेच मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

---

## महालगावातील सराफा दुकानात चोरीचा प्रयत्न

### सायरन वाजताच चोरांचा पळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** महालगाव येथील मुख्य रस्त्यावरील एका सोन्या - चांदीच्या दुकानात शुक्रवारी (दि. ३१) मध्यरात्री सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास चोरीचा प्रयत्न झाला. मात्र, दुकानातील वस्तुला हात लागताच सुरक्षा यंत्रणेचा सायरन वाजल्याने चोरांनी घटनास्थळावरून तातडीने पळ काढला. त्यामुळे चोरीचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

या संपूर्ण घटनेचे चित्रण दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, त्याच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू होण्याची शक्यता आहे.

चोरी करण्यापूर्वी चोरट्यांनी परिसरातील नागरिकांना बाहेर पडता येऊ नये म्हणून दुकानाच्या शेजारील व समोरील घरांना बाहेरून कड्या लावल्या होत्या. तसेच अंधार निर्माण करण्याच्या उद्देशाने दुकानाबाहेरील विद्युत बल्बवर काळा स्प्रे मारल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

दरम्यान, या घटनेबाबत सायंकाळपर्यंत विरगाव पोलीस ठाण्यात कोणतीही नोंद झालेली नव्हती. या धाडसी चोरीच्या प्रयत्नामुळे महालगाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, रात्रीच्या गस्तीमध्ये वाढ करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME IN SON BIRTH CERTIFICATE
ALTAF ISAK BAGWAN
( BEFORE NAME )
TO NEW NAME AS
ALTAF MAHAMMADISAK BAGWAN
(AADHAR NO. 4485 5684 5343)
FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR
PLACE: SHRIRAMPUR
DATE : 31/07/2026

---

## समाधान शिबिरात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून खडाजंगी

### श्रेयवादावरूनही राजकीय जुगलबंदी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** विविध शासकीय योजनाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात' गुरुवारी शिऊर येथे हजारो नागरिकांना दाखले व मंजुरीपत्रांचे वितरण करण्यात आले. मात्र, शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, निमंत्रणपत्रिकेवरून निर्माण झालेला वाद आणि विकासकामांच्या श्रेयवादावरून रंगलेली राजकीय जुगलबंदी यामुळे कार्यक्रम चांगलाच चर्चेचा विषय ठरला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्री संत शंकरस्वामी महाराज मंगल कार्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रा. रमेश बोरनारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात महसूल, कृषी, आरोग्य, पंचायत राज आदी विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबिरामध्ये एकूण ४ हजार १६८ दाखले व विविध योजनांच्या मंजुरीपत्रांचे वितरण कण्यात आले.दरम्यान, निमगाव-टूनकी परिसरातील दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शेतरस्त्याच्या प्रश्नावरून जनक्रांती सेनेचे अध्यक्ष अजय साळुंके यांनी प्रशासनाला धारेवर धरले. सत्कार सोहळे आणि प्रदीर्घ भाषणांमुळे शेतकरी व महिलांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणीही त्यांनी केली.

यावर उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जहाड यांनी वादग्रस्त शेतरस्त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असे आश्वासन दिले. वैजापूरचे नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनीही शिबिर केवळ औपचारिकता न राहता नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा देणारे ठरावे, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, तहसीलदार सुनील सावंत, विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दाखले आणि मंजुरीपत्रांचे वितरण झाले असले, तरी शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा निघावा, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.निमंत्रणपत्रिकेवरून वाद; व्यासपीठावरच हल्लाबोल कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेवरूनही राजकीय वातावरण तापले. प्रारंभी छापण्यात आलेल्या पत्रिकेत काही स्थानिक पदाधिकाऱ्यांची नावे वगळण्यात आल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. वाद वाढल्यानंतर घाईघाईने दुसरी निमंत्रणपत्रिका छापून त्यात जिल्हा परिषद सदस्य, सभापती आणि प्रशासकांची नावे समाविष्ट करण्यात आली. मात्र, हा वाद थेट व्यासपीठावर पोहोचला.

जिल्हा परिषद सदस्य संजय निकम यांनी आपल्या भाषणात आमदार रमेश बोरनारे यांचे नाव घेत निमंत्रणपत्रिकेतील गोंधळावरून तीव्र नाराजी व्यक्त करत जोरदार टीका केली. त्यांच्या वक्तव्यानंतर काही काळ वातावरण तापले होते. विकासकामांच्या श्रेयावरून जुगलबंदी

शिऊर परिसरातील विकासकामांच्या श्रेयावरूनही कार्यक्रमात राजकीय चकमक रंगली. आमदार रमेश बोरनारे यांनी पंचायत समितीच्या माध्यमातून दोन रस्त्यांची कामे पूर्ण केल्याचा दावा केला. त्याला प्रत्युत्तर देताना जिल्हा परिषद सदस्य संजय निकम यांनी सहा रस्त्यांची कामे आपल्या प्रयत्नातून पूर्ण झाल्याचा दावा केला. या दाव्या-प्रतिदाव्यांमुळे उपस्थितांमध्ये चांगलीच चर्चा रंगली.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**
**शनिवार दि .१ ऑगस्ट २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१२० ३४६ ३३७ | ३-० | १९० २८० ४६०
जोड: ३१-६०-२८-३५-०७

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१४० १५९ ११३ | ५-० | १९० ४६० ५५०
जोड: ५२-६०-९१-७४-०८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
- | सुट्टी | -
जोड: -

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 9 | | | | |

द•ख•ल



## रुपीबाई मोतीलालजी बोरा प्रशालेत गुरुपौर्णिमा उत्साहात

**नगर तालुका :** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल या प्रशालेत गुरुपौर्णिमा अर्थात व्यास पूजन वेगळ्या व अभिनव पद्धतीने साजरी झाली. विद्यालयाचे प्राचार्य रविकिरण भांड, उपप्राचार्य विष्णू गिरी व पर्यवेक्षक अरविंद आचार्य यांच्या मार्गदर्शनात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विशेष उपक्रमाअंतर्गत इयत्ता पाचवी ते इयत्ता दहावी पर्यंतच्या प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी व्यास पूजन, दीप प्रज्वलन, प्रास्ताविक, भाषणे, आभार व सूत्रसंचालन स्वतःहून सादर केले .यावेळी वर्गशिक्षक व अतिथी यांचा विद्यार्थ्यांनी श्रीफळ, गुलाबपुष्प देऊन खास सत्कार करण्यात आला. प्रत्येक वर्गापुढे सुंदर रांगोळी छटांचे आयोजन केले होते. वर्ग सजावट व आखीव रेखीव नियोजन यामुळे शाळेचे वातावरण चैतन्यमय झाले होते. विद्यार्थ्यांनी स्वतः हून सादर केलेली ही गुरुपौर्णिमा शिक्षकांना खूपच भावली. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांनी सत्कार केला. गुरुपौर्णिमेच्या वातावरणामुळे शाळेमध्ये चैतन्य निर्माण झाले होते.

## साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे कथा स्पर्धेचा निकाल जाहीर

**अहिल्यानगर :** ज्ञानकौशल्य ट्रस्ट व श्रोता ऑडिओ बुक ॲप यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे कथा स्पर्धा २०२६'चा निकाल अण्णा भाऊंच्या जयंती दिनाच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी जाहीर करण्यात आला. या स्पर्धेला राज्यसह परदेशातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १८३ कथाकार स्पर्धकांनी २०७ कथांसह यात सहभाग नोंदविला. याबद्दल अधिक माहिती देताना समन्वयक व ट्रस्टच्या सचिव माधुरी चोभे यांनी सांगितले की, मराठीतील थोर साहित्यिक आणि विचारवंत म्हणून अण्णा भाऊ साठे यांची ओळख आहे. त्यामुळेच त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासह नवीन कथाकार आणि लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ही कथास्पर्धा आयोजित केली होती. महाराष्ट्र राज्यसह परदेशात स्थायिक असलेल्या मराठी भाषिक लेखकांनी यात सहभाग घेतला. त्यामुळे ही कथा स्पर्धा जागतिक पटलावर पोहचली. आयोजक म्हणून आम्हाला याचा आनंद आहे. स्पर्धेस उत्तम प्रतिसाद लाभला. सर्व बक्षीसपात्र कथाकार यांना नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनात बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. बक्षीसपात्र कथा तसेच दर्जे दार आणि पात्र अशा सुमारे ५० कथांना श्रोता ऑडिओ बुक ॲप यावर विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहे.



## मलेशियातील जागतिक परिषदेसाठी सविता नितीन बोठे यांची निवड

**अहिल्यानगर :** एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या वतीने मलेशिया येथे १ ते ५ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय जागतिक परिषदेसाठी अहिल्यानगर येथील हेल्थ प्लॅनर तथा श्रीराम इन्शुरन्स सर्व्हिसेसच्या संचालिका सविता नितीन बोठे यांची निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विमा क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे. या जागतिक परिषदेसाठी संपूर्ण भारतातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोजक्या विमा सल्लागारांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये अहिल्यानगरच्या सविता बोठे यांनी स्थान मिळवले आहे. परिषदेत जगभरातील विमा क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित राहून आरोग्य विमा क्षेत्रातील नव्या संकल्पना, आधुनिक सेवा, नवीन पॉलिसी, ग्राहकाभिमुख योजना तसेच कंपनीची भावी ध्येयधोरणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. विविध तांत्रिक सत्रे, चर्चासत्रे आणि अनुभवांची देवाणघेवाण याद्वारे सहभागी प्रतिनिधींना आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान मिळणार आहे. या निवडीबद्दल एचडीएफसी एर्गो हेल्थ इन्शुरन्सच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सविता नितीन बोठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाखेतील अधिकारी, विमा सल्लागार तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. सविता बोठे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या विमा क्षेत्राचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# श्रमिकनगरमध्ये बागुलू पंडुगू उत्साहात

## पोशम्मा तल्ली व लचमम्मा तल्ली देवींकडे आरोग्य शांतीसाठी साकडे!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पद्मशाली समाजाचा पारंपरिक बागुलू पंडुगू (बागेचा सण) श्रमिकनगर, सावेडी येथे शुक्रवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. श्रमिकनगर येथील शितळादेवी (पोशम्मा तल्ली) आणि लक्ष्मीमाता (लचमम्मा तल्ली) या दोन्ही मंदिरांमध्ये पहाटेपासूनच देवीच्या दर्शनासाठी, पूजा-अर्चेसाठी व पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्यासाठी पद्मशाली समाजातील महिला भगिनींसह भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या पारंपरिक यात्रा उत्सवाचे आयोजन श्री श्रमिक बालाजी सामाजिक संस्था ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले होते. ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी यात्रेचे नियोजन व व्यवस्था उत्तम प्रकारे सांभाळल्यामुळे संपूर्ण धार्मिक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यात्रा उत्सवानिमित्त पोतराजांच्या उपस्थितीत महिलांनी डोक्यावर आकर्षक सजविलेले बोणालू (कलश) घेऊन ढोल-ताशे आणि पारंपरिक वाद्यांच्या



गजरात परिसरातून भव्य मिरवणूक काढली. अनेक महिला भगिनींनी आपल्या नवसपूर्तीसाठी डोक्यावर बोणालू वाहून यात्रेत सहभाग घेतला. संपूर्ण परिसर जयघोषाने आणि भक्तिरसाने दुमदुमून गेला होता.

या यात्रेत श्रमिकनगर, सावेडी परिसरातील पद्मशाली समाजाबरोबरच सर्व समाजातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने सामाजिक ऐक्याचे सुंदर दर्शन घडले. बागुलू पंडुगू हा पद्मशाली समाजाचा पारंपरिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा सण असून तो दरवर्षी आषाढ शुद्ध पौर्णिमेनंतर येणाऱ्या शुक्रवारी साजरा केला जातो. या दिवशी पोशम्मा तल्ली आणि लचमम्मा तल्ली देवीची विधिवत पूजा करून समाजातील सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे, रोगराईपासून संरक्षण मिळावे, संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी, शेती समृद्ध राहावी तसेच समाजात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली जाते. देवीला गोड पुरी, मेथीची भाजी, दही, हळद टाकलेला भात, नारळ, फुटाणे, लिंबाची पाने, ओवा आणि थंड पाणी असा पारंपरिक नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे. दिवसभर दोन्ही मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला भगिनींनी भक्तिभावाने देवीची पूजा करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. श्रद्धा, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडविणारा बागुलू पंडुगू उत्सव यंदाही श्रमिकनगर परिसरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

## युवा शक्ती, नशा मुक्त भारताची शक्ती विषयावर सीएसआरडीत जनजागृती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत मेरा युवा भारत व बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवा शक्ती नशा मुक्त भारताची शक्ती या विषयावर आधारित विविध जिल्हास्तरीय स्पर्धा सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्थेच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे आणि त्यांच्या सर्जनशील कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वामने, तसेच मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजित संतोष उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे हे उपस्थित होते.

स्पर्धांचे परीक्षण संगीत, नृत्य, साहित्य, समाजकार्य, पत्रकारिता, फोटोग्राफी, चित्रकला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञांनी केले. यामध्ये प्रसिद्ध गायिका वैदेही बल्लाळ, शिल्पा सूर्यवंशी, निहाल घोडके, जानवी लटके, दशरथ शिंदे, शर्मिला गोसावी, विकास कांबळे, संदेश सूर्यवंशी, शिवानी शिंगवी यांनी परीक्षण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल पाडर व राहेल शिरसाठ यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रदीप जारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेरा युवा भारत, अहिल्यानगरचे श्रीकुष्ण मुरकुटे तसेच सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, ट्विंकल ईश्वरी, नाजीम बागवान यांच्यासह कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक तसेच आयोजन समितीने परिश्रम घेतले.

## शाळा मुलांचे भविष्य घडविणारी केंद्रे : भंडारी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्हा परिषदेच्या शाळा आजही अनेक खाजगी शाळांपेक्षा अधिक दर्जेदार शिक्षण देत आहेत. त्यामुळे या शाळांचे अस्तित्व टिकविणे ही काळाची गरज असून, त्या मॉडेल स्कूल म्हणून विकसित करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घ्यावा. जिल्हा परिषद शाळा टिकल्या नाहीत तर शिक्षणाचे बाजारीकरण होईल आणि त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना बसेल. त्यामुळे गावागावातील शाळांची जबाबदारी स्वीकारून त्यांना सक्षम करण्यासाठी समाजाने पुढे यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने १४ वर्षांपासून संस्था गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शैक्षणिक पालकत्वाची संकल्पना राबवत असून, यंदा तब्बल ३ हजार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पालकत्वाचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात आला आहे. तसेच अहिल्यानगर मधील जिल्हा परिषद व इतर शाळांमधील गरजू घटकातील ७०० विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करुन शैक्षणिक पालकत्व उपक्रम राबविण्यात आला. यावेळी भंडारी बोलत होते. माऊली सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास उद्योजक अनुराग धुत, उदयोजक राघवेंद्र बिहाणी, उदयोजक कमलेश झंवर , जिल्हा परिषद सीएसआर समितीचे रमेश कासार निरंजन संस्थेचे अतुल डागा, जयेश कासट, स्वप्निल कुलकर्णी , राहुल झंवर , मुकुंद धुत, सुमित चांडक, राहुल ओझा, दिनेश भाटिया, अभिजीत बिहानी, योगेश सिकची, पियुष झंवर, गोविंद दरक, सिद्धार्थ झंवर,पवन बंग , सौ प्राजक्ता डागा , रोहन मंत्री, प्रसाद बजाज, वैभव जाधव यांच्यासह संस्थेचे सदस्य, शालेय शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोन्यापेक्षा मौल्यवान ठरला प्रामाणिकपणा साईभक्त मोहन औटींचा गौरव



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पैश्यापेक्षा माणुसकी आणि प्रामाणिकपणा अधिक मोठा असतो, याचा प्रत्यय केडगाव येथे गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित महाप्रसाद सोहळ्यात आला. मोहिनी नगर येथील साई मंदिरात हजारो भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असताना एका महिलेच्या गळ्यातील सुमारे दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण गर्दीत नकळत गळून पडले.

काही वेळाने गंठण हरवल्याचे लक्षात येताच त्या महिलेने मंदिर परिसरात शोधाशोध सुरू केली. अमूल्य दागिना हरवल्याने ती भावूक झाली होती. परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद वाटपाची सेवा बजावत असलेले साईभक्त मोहन औटी यांच्या नजरेस ते सोन्याचे गंठण पडले. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तत्काळ आयोजकांकडे जाऊन गंठण जमा केले आणि ध्वनिक्षेपकावरून ज्यांचे गंठण हरवले आहे त्यांनी ओळख पटवून ते घेऊन जावे, असे आवाहन करण्यास सांगितले.

घोषणा ऐकताच संबंधित महिला धावत आली. योग्य ओळख पटविल्यानंतर मोहन औटी यांनी तिच्या हाती सुरक्षितपणे सोन्याचे गंठण सुपूर्द केले. हरवलेली अमूल्य वस्तू परत मिळाल्याच्या आनंदाने त्या महिलेच्या डोळ्यांत अश्रू तरळले. तिने मोहन औटी यांचे मनापासून आभार व्यक्त केले. मोहन औटी यांच्या प्रामाणिकपणाचे साई सेवा मंडळ तसेच केडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक व सेवाभावी वृत्तीचा गौरव करण्यात आला.

## रस्त्याचे काम लवकरच मार्गी लावू; आ. जगताप यांचे आश्वासन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील कल्याण रोड प्रभाग क्रमांक ९ मधील अनुसया नगर येथील डीपी रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना रोजच्या प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याच्या तातडीने दुरुस्ती व विकासकामासाठी आ. संग्राम जगताप यांच्याकडे निवेदन देण्यात आले असून, रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावण्याचे



आश्वासन त्यांनी दिल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी दिली.

यावेळी बोलताना ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, अनुसया नगर येथील डीपी रस्ता हा परिसरातील प्रमुख संपर्क मार्ग असून या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी, महिला आणि वाहनचालकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे वाहतूक धोकादायक बनली असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल आणि पाणी साचत असल्याने दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा किरकोळ अपघातही घडत असून शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना या रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. त्यामुळे या रस्त्याचे काँक्रीटीकरण व कायमस्वरूपी विकासकाम तातडीने होणे आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली.

## संजीवनी कॉलनीत खंड्या किंगफिशर पक्ष्याचे दर्शन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रेल्वे स्टेशन - मल्हार चौक परिसरातील संजीवनी कॉलनीच्या ओपनस्पेसमध्ये खंड्या म्हणजेच किंगफिशर पक्ष्याचा मुक्त संचार आढळला असून पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असलेला हा पक्षी आढळणे म्हणजे कॉलनीतील समृद्ध जैवविविधतेचे सकारात्मक संकेत मिळत असल्याची माहिती हरीभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी दिली.

दोन वर्षांपूर्वी शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून कॉलनीतील ओपनस्पेसला संरक्षक भिंत बांधण्यात आली होती. त्यानंतर पक्षी संवर्धनाच्या हेतूने चेरी फळांची ०९ व शंखासुराची १८ झाडे लावण्यात आली होती. त्यांची उत्तमपणे वाढ सुरू असून मोठ्या प्रमाणात चेरीची फळे व शंखासुराची फुले बहरू लागली आहेत.



त्यामुळे येथे विविध प्रकारचे पक्षी व फुलपाखरे मुक्तपणे संचार करत आहेत. परिसराला बर्ड पार्कचे स्वरूप प्राप्त झाले असून ही बाब कॉलनीतील पर्यावरणीय समतोल व समृद्ध जैवविविधतेचे महत्त्वपूर्ण द्योतक मानली जाते. पक्षी संवर्धनासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार आणखी प्रयत्न करण्यात येणार आहेत. ओपनस्पेस हरीत व विकसित करण्यासाठी कॉलनीतील जेष्ठक्ष सदस्य श्रीकृष्ण लांडगे यांचे मार्गदर्शन व देखभालीसाठी कॉलनीतील सदस्य राजेंद्र बळे व पंकज शिपणकर यांचे सहकार्य लाभत असल्याचे अभय ललवाणी यांनी सांगितले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जन्मजयंती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल ण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे दि.५ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण व प्रबुध्द विचारक प.पू.आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेतून हे शिबिर घेण्यात येत आहे. दररोज स. १० ते दु. २ या वेळेत तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टर रूग्ण तपासणी करणार आहेत. दरवर्षी राबविण्यात येणार्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचा लाभ असंख्य रूग्णांना झाला आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल एन.ए.बी.एच.मान्यता प्राप्त असून जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. हॉस्पिटलमध्ये विविध प्रकारच्या तपासण्या अल्प दरात उपलब्ध आहेत. तसेच शिबिरात सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे. या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला बुधवार (दि.५) रोजी सुरूवात होईल. पहिल्या दिवशी सवलतीच्या दरात पेंडिक्स व इंगवायनल हर्निया, हायड्रोसील इ. शस्त्रक्रिया करण्यात येतील. शुक्रवार (दि. ७ ) रोजी ब्लड प्रेशर, डायबिटीस, साथीचे आजार व सर्व रोग तपासणी व निदान शिबीर होईल. शनिवार (दि. ८.) रोजी दंतरोग तपासणी व उपचार शिबीर होणार आहे. यात दातांच्या नसावरील उपचार, मेटल कॅप, सिरॅमिक कॅप, रुट कॅनल, दातांची कवळी बसवणे, दात साफ करणे, दातात सिमेंट भरणे, दात काढणे आदी उपचार केले जातील.रविवार (दि. ९ ) रोजी हृदयरोग तपासणी व यात जिओग्राफी तपासणी ३ हजार रुपयांत केली जाईल . हृदय शस्त्रक्रिया हृदयातील झडप बदलणे, छिद्रे बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व अँजिओप्लास्टी महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत केल्या जातील. सोमवार (दि. १०) रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. यात लॅप्रोस्कोपीव्दारे पोटातील, बेंबी, हर्नियाची शस्त्रक्रिया, पित्ताशय काढणे, गर्भाशयाची पिशवी काढणे, स्टॅपलर लेझर पाईल्स शस्त्रक्रिया, अपेंडिक्स शस्त्रक्रिया, स्त्रीयांची कुटुंबनियोजन इ. शस्त्रक्रिया केल्या जातील.



मंगळवार (दि. ११ ) रोजी कान, नाक, घसा व स्पीच थेरपी तपासणी शिबीर होईल. हॉस्पिटलमध्ये ऑडिओमेट्री, स्पीच थेरपी सुविधा उपलब्ध आहे. बुधवार (दि.१२) रोजी पोट विकार तपासणी शिबिर होईल. गुरूवार (दि.१३) रोजी मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. डोकेदुखी, अपस्मार, पॅरालिसिस, कंबरदुखी, नसांचे विकार, स्नायूंचे विकार, मेंदूतील जंतुसंसर्ग, मेंदूज्वर, स्मृतीभ्रंश इ. आजारांची तपासणी व उपचार केले जातील. मणक्यातील चकती सरकणे, झटके येणे, ट्रॉमा सर्जरी, मेंदूतील रक्तस्त्राव, स्लिपडिस्क आदी समस्यांवर उपचार व शस्त्रक्रिया केल्या जातील.शुक्रवार (दि. १४) रोजी किडनी आजार तपासणी शिबिर होईल. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी अथवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, किडनी प्रत्यारोपण मार्गदर्शन, डायलेसिस रूग्ण तपासणी व मार्गदर्शन केले जाईल. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. सोमवार (दि. १७) रोजी स्त्रीरोग, गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबीर होणार आहे. यात दुर्बिणीव्दारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाची पिशवी काढणे, सिझेरियन सवलतीच्या दरात होईल. शिबिरातील गर्भवती मातांना बाळंतपणावेळी होणार्या फीमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे.शुक्रवार (दि.२१ ) रोजी बालरोग तपासणी शिबीर होणार आहे. यात लहान मुलं, नवजात शिशुंचे आजार आणि तपासणी, लहान मुलांच्या हर्निया, हायड्रोसील, फिमोसिस, डिसेंड टेस्टीस इत्यादी शस्त्रक्रिया केल्या जातील.

शनिवार (दि.२२ ) रोजी कॅन्सर तपासणी शिबीर होणार आहे. यात घसा, फुफ्फुस, आतडे, तोंडाचा इ. कॅन्सर तपासणी, स्त्रियांचे कॅन्सर तपासणी, मॅमोग्राफी तपासणी १०० रू. करण्यात येईल. स्त्रियांच्या गर्भ पिशवीच्या कॅन्सरच्या तपासणीसाठी सवलतीच्या दरात पॅपस्मीयर तपासणी केली जाणार आहे. रविवार (दि. २३) रोजी नेत्ररोग तपासणी शिबीर होणार आहे. महावीर भवन येथील आनंदऋषीजी नेत्रालय येथे होणार्या या शिबिरात अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. सोमवार (दि.२४) रोजी एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय), स्टोन तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर होणार आहे. प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी उपचार केले जातील. रूग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. मंगळवार (दि.२५) रोजी अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. इंपोर्टेड इम्प्लांटसह संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण केले जाईल. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनोंतर्गत पात्र लाभार्थींच्या शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. शिबिरांची सांगता शुक्रवार (दि. २८ ) रोजी प्लॅस्टिक सर्जरी शिबीराने होणार आहे. यात लहान मुलांच्या हाताच्या जन्मजात समस्या, व्यंग, मधुमेहामुळे होणार्या जुनाट जखमा, पायाच्या जखमा, दुभंगलेले ओठ, तुटलेले कान, चेहर्यावरील व्रण, तोंड , गाल, ओठ, जीभ, जबडा, सायनस, लाळ ग्रंथीच्या गाठीचे निदान व उपचार मार्गदर्शन केले जाईल. स्माईल ट्रेन प्रोजेक्ट अंतर्गत शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील. तरी या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे. हॉस्पिटलमध्ये २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक कार्यरत आहे.


### जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय,
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, अहिल्यानगर**
पत्ता-सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्यच्या शेजारी अहिल्यानगर
छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३
website.www.mahawakf.com Email-dwonbilyanaramahawakf.com

संचिका क्र.६९/४४८/२०२२ क्र. वक्फ अहिल्यानगर चौकशी १५२/२०२६

**जाहिर प्रगटन** दिनांक २९/०७/२०२६

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.
वक्फसंस्थेचे नाव व पत्ता-Madarsa Darsul Quran At Shevgaon Tq. Shevgaon Dist. Ahilyanagar
उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य मंडळात क्र. MSBW/ADR/४२/२००६ अन्वये नोंदणीकृत असून अर्जदार अब्दुलरज्जाक इब्राहीम शेख व इतर यांनी दि. १७/०७/२०२६ रोजीच्या अन्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित व्यवस्थापकीय समिती सदस्यांच्या बहुमताने नविन सदस्यांची नियुक्ती करतील योजनेमध्ये नमुद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | अब्दुलरज्जाक इब्राहीम शेख | अध्यक्ष |
| २ | जाकीर बुरहान शेख | उपाध्यक्ष |
| ३ | नवाब हमीद शेख | सचिव |
| ४ | फकीरमहम्मद चांद शेख | खजिनदार |
| ५ | राजू पिरखा पठाण | सदस्य |
| ६ | शेखनूर वहाब शेख | सदस्य |
| ७ | सलीम महेमूद शेख | सदस्य |
| ८ | निजाम बंडुभाई पटेल | सदस्य |
| ९ | शोएब शब्बीर पठाण | सदस्य |
| १० | अमजदखान हाफिजखान पठाण | सदस्य |
| ११ | शब्बीर कासम शेख | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यस संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, पत्ता-सुरभी हॉस्पिटल जवळ कविजंग लॉन्सच्या शेजारी अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हायवे अहिल्यानगर ४१४००३ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी,

(शिक्का)
सही/-
जिल्हा वक्फअधिकारी, अहिल्यानगर

# डिंभे धरण ९१.१५ टक्के भरले

## घोड नदीपात्रात ८,५०० क्युसेक विसर्ग सुरू

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरण ९१.१५ टक्के भरले असून पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणातील पाणी पातळीत सातत्याने वाढ होत आहे. पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आणि धरणाच्या सुरक्षिततेचा उपाय म्हणून डिंभे धरणाच्या सांडव्यावरून वक्र दरवाजांद्वारे घोड नदीपात्रात ८,५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.



कुकडी पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, डिंभे धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असल्याने धरणात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणावर होत आहे. धरणाची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी टप्प्याटप्प्याने पाण्याचा विसर्ग वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जर धरणाच्या वरच्या भागात पावसाचा जोर असाच कायम राहिला किंवा पावसाची तीव्रता वाढली, तर घोड नदीपात्रातील विसर्गामध्ये कधीही टप्प्याटप्प्याने वाढ केली जाऊ शकते. त्यामुळे स्थानिक प्रशासनाकडून जलप्रवाह आणि धरणातील पाणी पातळीवर चोवीस तास बारीक लक्ष ठेवले जात आहे.घोड नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू झाल्यामुळे नदीकाठच्या सर्व गावांना खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने डिंभे, गोहे, कानसे, महाळुंगे तर्फे घोडा, शिनोली, घोडेगाव, पारगाव आणि लगतच्या परिसरातील सर्व नागरिक, शेतकरी व पर्यटकांना प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

नदीपात्रात किंवा पाण्याच्या प्रवाहात कोणीही उतरू नये, जनावरे, शेतीपंप, वाहने व साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावे, नदीकाठच्या व सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षितता बाळगावी, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित ग्रामपंचायती आणि महसूल प्रशासनाला आपापल्या क्षेत्रातील नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आली असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शासकीय सूचनांचे पालन करावे.

## छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान जुन्नर तालुक्यात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर श्री विघ्नहर सास्कृतिक भवन ओझर येथे आयोजित करण्यात आले. या शिबाराचे उद्घाटन आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात एकूण २२ स्टॉलच्या माध्यमातून १ हजार ६४१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.



यावेळी जुन्नर-आंबेगाव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे, तहसीलदार रणजीत भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील, तालुक्यातील शासकीय विभागातील कार्यालय प्रमुख व पंचायत समिती सभापती / उपसभापती व जिल्हा व पंचायत समिती सदस्य आदी उपस्थित होते.तहसील कार्यालयातील संजय गांधी विभाग, पुरवठा विभाग, सेतू कार्यालय व महसूल विभाग उपस्थित होता. तसेच तालुक्यातील सर्व गावांचे ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी उपस्थित होते. पंचायत समिती, तालुका कृषी कार्यालय महावितरण विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प घोडेगांव, नगर परिषद विभाग, सहाय्यक निबंध कार्यालय जुन्नर, भूमी अभिलेख कार्यालय, बँक ऑफ महाराष्ट्र, पोस्ट ऑफिस जुन्नर, पोलीस विभाग, एस टी महामंडळ व इतर उपस्थित होते. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला. यामध्ये वृद्धापकाळ, विधवा, दिव्यांग योजना, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, आधार लिंक आदी विविध सेवांचा समावेश होता.

नागरिकांना विविध योजनांची माहिती देण्यात आली, नागरिकांनी शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला.



## वाघोलीत पारंपरिक पालखी सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वाघोली :** वाघोली येथील मॅजेस्टिक मॅनहॅटन फेज-२ सोसायटीमध्ये ज्येष्ठ नागरिक संघ व ओंकार महिला भजनी मंडळाच्या संयुक्त विद्यमाने पारंपरिक पालखी सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यात सुमारे दीड हजार वारकरी व भाविकांनी सहभाग घेत विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. नगरसेवक अनिल सातव, मीना सातव, सुजाता सातव, कामिनी राजे-भोसले, अश्विनी सावंत, ज्योती सातव, मीनाताई गागरे व केतन जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती व बालकांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत पालखीत सहभाग घेतला. टाळ-मृदंग, अभंग, हरिनामाच्या गजरासह फुगड्यांनी वातावरण रंगले. भाविकांसाठी महाप्रसाद म्हणून साबुदाणा खिचडी, लाडू व केळीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून वारकरी परंपरा, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशासाठी ज्येष्ठ नागरिक संघ, ओंकार महिला भजनी मंडळ आणि सोसायटीतील स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिल्याची माहिती समाजसेवक व उद्योजक अशोक घायाळ पाटील यांनी दिली.

### दखल



## डुंबरवाडीत गुरुपौर्णिमा महोत्सवात हजारो भक्तांचा सहभाग

**आळेफाटा :** डुंबरवाडी , ता. ता. जुन्नर येथील पवित्र श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित महोत्सव अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि दिव्य वातावरणात संपन्न झाला. मंदिर परिसरात दिवसभर स्वामी नामाचा गजर घुमत होता. पहाटेपासूनच हजारो स्वामीभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. गर्दीचे नियोजन, दर्शन व्यवस्था, महाप्रसाद, स्वच्छता आणि धार्मिक विधी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

या महोत्सवाच्या यशाचे श्रेय मंदिर समितीने सर्व सेवेकऱ्यांना दिले. कोणी स्वच्छता, कोणी पूजा तयारी, कोणी महाप्रसाद, तर कोणी वाहन व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. माता-भगिनी, युवक, ज्येष्ठ आणि दात्यांच्या निस्वार्थ योगदानामुळे हा सोहळा यशस्वी झाला.भक्ती शक्ती मंदिर समितीच्या वतीने सर्व सेवेकऱ्यांचे, दात्यांचे आणि भक्तांचे आभार मानण्यात आले. जोपर्यंत श्वास आहे तोपर्यंत स्वामींची सेवा सुरू राहील असा संकल्प यावेळी करण्यात आला.

## दौंडच्या राजकारणात शिंदे सेनेचा वाढता प्रभाव

### अनेकांचा प्रवेश देतोय परिवर्तनाचे संकेत

हरिभाऊ बळी / राष्ट्र सह्याद्री

दौंड - दौंड तालुक्यातील राजकारणात शिवसेना, शिंदे गट नव्या उमेदीने सक्रिय होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या बदलामागे महेश पासलकर यांच्या प्रभावी नेतृत्वाची आणि सातत्यपूर्ण संघटनात्मक कार्याची महत्वपूर्ण भूमिका असल्याची चर्चा सध्या दौंडच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.



मागील काही महिन्यांपासून दौंड तालुक्यातील वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांचा शिवसेना शिंदे गटात झालेला प्रवेश हा एकूणच दौंडच्या स्थानिक राजकारणात पक्षाचे बळ वाढविणारा ठरत आहे. आगामी काळात राष्ट्रीय पक्ष असणाऱ्या भाजपलाही हा पक्ष मागे टाकतो की काय अशी शक्यता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांचे विचारांनी प्रेरित होऊन दौंड विधानसभा मतदार संघातील तरुणांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय चौफुला या ठिकाणी शिवसेनेत प्रवेश केला. तरुणांच्या या पक्ष प्रवेशाने शिवसेना शिंदे गट संघटनेला दौंड तालुक्यात नवी उर्जा मिळाल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. या पक्ष प्रवेशावेळी जिल्हा प्रमुख महेश पासलकर, उपजिल्हाप्रमुख विजयसिंह चव्हाण, युवा सेना तालुका अध्यक्ष शुभम माळवे, शिवसेना विधानसभा प्रमुख हनुमंत निगडे, तालुका समन्वयक नवनाथ जगताप, तालुका संघटक किसन हंडाळ, दौंड शहर प्रमुख अमोल जगताप, केडगाव शहर प्रमुख आशिष गायकवाड, तालुका प्रसिध्दी प्रमुख राहूल फडके यांसह मोठ्या संख्येने, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वळती-शिंगवे मार्गावरील मांगीरबाबा पूल जीवघेणा

### ग्रामस्थांची तातडीच्या कामाची मागणी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील वळती-शिंगवे मार्गावरील मांगीरबाबा मंदिराजवळील ओढ्यावरील पूल अत्यंत जीर्ण झाल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलावरील वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले असतानाही प्रत्यक्षात पुलावरून वाहतूक सुरू असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता व्यक्त केली जात आहे.



सुमारे ४० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या या पुलाची उंची कमी असल्यामुळे मीना नदीला पूर आल्यानंतर तो वारंवार पाण्याखाली जातो. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होऊन परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. सध्या पुलाच्या तळभागातील काँक्रीट अनेक ठिकाणी निखळले असून लोखंडी सळ्या उघड्या पडल्या आहेत. गंजलेल्या सळ्यांमुळे पुलाची मजबुती कमी झाली असून कोणत्याही क्षणी दुर्घटना घडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

या पुलाच्या धोकादायक अवस्थेबाबत वळती ग्रामपंचायतीने ३ ऑगस्ट २०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी निवेदन सादर केले होते. त्यानंतर करण्यात आलेल्या तांत्रिक पाहणीत हा पूल वाहतुकीसाठी असुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्याने विभागाने वाहतूक बंद करण्याचे आदेश जारी केले. मात्र आदेशानंतरही दुचाकी, चारचाकी तसेच काही अवजड वाहने पुलावरून प्रवास करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका ग्रामस्थांकडून होत आहे.

दरम्यान, या ठिकाणी नवीन पूल उभारण्यासाठी निधी मंजूर झाल्याची माहिती असली तरी प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. त्यामुळे केवळ वाहतूक बंदीचे आदेश देऊन न थांबता नवीन पुलाचे काम तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.


### जाहीर सूचना

**'मार्वल रिअल्टर्स अँड डेव्हलपर्स लिमिटेड'** तर्फे तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे खराडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील स नं.६९/४/२ व ६९/५(पार्ट) वर प्रस्तावित रहिवाशी इमारतीच्या प्रकल्पास 'राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र' यांच्याकडून EC Identification No. **EC26C3801MH5949599N** अन्वये पर्यावरणविषयक मंजूरी मिळाली आहे. ही मंजूरी पर्यावरण परिणाम मूल्यांकन अधिसूचना EIA Notification 2006 नुसार देण्यात आलेली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ' येथे उपलब्ध असून, **parivesh.nic.in** या संकेतस्थळावरही पाहिली जाऊ शकते.

**Date:01/08/2026** **मार्वल रिअल्टर्स अँड डेव्हलपर्स लिमिटेड**

### जाहीर सूचना

**'एमव्हीए रियल इस्टेटस एलएलपी'** तर्फे तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे हडपसर, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील सिटिएस नं. ४४१३ यासी स. नं. १५१/१९ + १५१/२०, प्लॉट नं.ए, येथे आमच्या प्रस्तावित 'मार्वल सेंटीनेल' या व्यावसायिक प्रकल्पाच्या विस्तारास 'राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र' यांच्याकडून EC Identification No. **EC26C3802MH5552098N** अन्वये पर्यावरणविषयक मंजूरी मिळाली आहे. हि मंजूरी पर्यावरण परिणाम मूल्यांकन अधिसूचना EIA Notification 2006 नुसार देण्यात आलेली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे उपलब्ध असून, **parivesh.nic.in** या संकेतस्थळावरही पाहिली जाऊ शकते.

**Date:01/08/2026** **एमव्हीए रियल इस्टेटस एलएलपी**


**महाराष्ट्र शासन वन विभाग**
**वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय. शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे ४१२२१०**
**निविदा सुचना क्र. १ सन २०२६-२०२७**

वनपरिक्षेत्र अधिकारी. शिरूर हे त्यांच्याकडील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्य योजना इको टुरिझम (राज्य) २४०६-२२९५ योजने अंतर्गेत खालील प्रमाणे कामांबाबत महाराष्ट्र शासनाच्या नोंदणीकृत कत्राटदार सुबे, खुला व मजुर सस्था यांचेकडन कामांकरिता बी - १ नमन्यातील निविदा मागवीत आहे. कोऱ्या निविदेचा नमना या कार्यालयाकडे दि. ३१/०७/२०२६ पासून ०६/०८/२०२६ पर्यंत दपारी १.०० वाजेपर्यत सट्रीचे दिवस वगळून देण्यात येतील. भरुन पाठविलेल्या निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी. वन विभाग. शिरूर यांचे कार्यालयात दि. ०७/०८/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकृत करण्यात येतील. निविदा स्विकृतीचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी. शिरूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

| Sr. No | Work Name | Amount | कामाचा वर्ग |
|---|---|---|---|
| 1 | Providing and fixing Ferrocement bcnches near medicinal garden in oxygen park atshirur in shirur (t) range of junnar division. | 801294/- | सु.बे. |
| 2 | Providing and fixing Ferrocement benches near rock and cactus garden in oxygenpark at shirur in shirur (t) range of junnar division. | 836730/- | सु.बे. |
| 3 | Drilling borewell and installation of submersible pump at oxygen park in gut no. 1140 in shirur (t) range of junnar division. | 264447/- | सु.बे. |
| 4 | Providing and fixing chain link fencing on c.c. wall to nagar palika jalshuddhikaranprakalp side in oxygen park in gut no.1140 at shirur in shirur (t) range of junnar division. | 827838/- | सु.बे. |
| 5 | Providing and fixing chain link fencing on c.c. wall to existing electric tower line sidein oxygen park in gut no.1140 at shirur in shirur (T) range of junnar division | 821828/- | सु.बे. |
| 6 | Providing and fixing chain link fencing on c.c. wall to parking area in oxygen park ingut no.1140 at shirur in shirur (T) range of junnar division. | 827838/- | सु.बे. |
| 7 | Providing Eco Pond in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 842317/- | सु.बे. |
| 8 | Providing Eco Friendly Pagoda No. 2 (Gazebo) in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824229/- | सु.बे. |
| 9 | Providing Eco Friendly Pagoda No. 3 (Gazebo) in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824229/- | सु.बे. |
| 10 | Providing Eco Friendly Pagoda No. 4 (Gazebo) in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824229/- | सु.बे. |
| 11 | Providing Eco Friendly Pagoda No. 1 (Gazebo) in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824229/- | सु.बे. |
| 12 | Providing Forest Pond in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division - | 831098/- | सु.बे. |
| 13 | Providing and Erecting Information / Direction Board in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 801633/- | सु.बे. |
| 14 | Providing and Fixing Kerb Stone to Parking Area in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 821971/- | सु.बे. |
| 15 | Providing Site Cleaning and leelling work in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur inshirur (T) range of junnar division. | 843552/- | सु.बे. |
| 16 | Providing & Prepairing Maze Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 1600059/- | सु.बे. |
| 17 | Providing & Prepairing Nakshtra Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 830406/- | सु.बे. |
| 18 | Providing & erecting Car Parking Shed in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 842941/- | सु.बे. |
| 19 | Providing & fixing Paver block to Parking Area in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division | 841457/- | सु.बे. |
| 20 | Providing & laying pipe line from Forest Pond to Bamboo Plantation in Oxygen Parkin Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 799732/- | सु.बे. |
| 21 | Providing & laying pipe line from Nagarpalika to Parking Shed in Oxygen Park in GutNo. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 837249/- | सु.बे. |
| 22 | Development of Parking Area in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 853010/- | सु.बे. |
| 23 | Providing Selfie Katta No. 2 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 436377/- | सु.बे. |
| 24 | Providing Selfie Katta No. 1 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 436377/- | सु.बे. |
| 25 | Providing Toilet Block for Ladies in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 832215/- | सु.बे. |
| 26 | Providing and Erecting Gents Toilet Block in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 812433/- | खुला |
| 27 | Providing flooring work and Ferrocement Plasster for Tree Otta in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 802989/- | खुला |
| 28 | Providing Tree Otta around trees (8 No) in Garden Campus in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 841818/- | खुला |
| 29 | Providing & erecting MS Watch Tower No. 2 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824716/- | खुला |
| 30 | Providing & erecting MS Watch Tower No. 3 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824716/- | खुला |
| 31 | Providing & erecting MS Watch Tower No. 4 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824716/- | खुला |
| 32 | Providing & erecting MS Watch Tower No. 1 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 824716/- | खुला |
| 33 | Providing and Erecting water Tank structure Platform in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 799135/- | खुला |
| 34 | Providing Bambooosetum in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 842799/- | खुला |
| 35 | Prepare Butterfly Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 770060/- | खुला |
| 36 | Providing Cactus Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 811412/- | खुला |
| 37 | Providing Creepers on Pargola in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 520186/- | खुला |
| 38 | Providing & constructing Eco Pond in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 840178/- | खुला |
| 39 | Providing Ganesh Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 840889/- | खुला |
| 40 | Providing Grass Plantation in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 797808/- | खुला |
| 41 | Providing Hedge Line Plantation in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 328720/- | खुला |
| 42 | Providing Medicinal Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 785929/- | खुला |
| 43 | Providing MS Pargola in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 809994/- | खुला |
| 44 | Providing Native Tree Plantation in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 809706/- | खुला |
| 45 | Providing Natural Trail Towords Nakshtra Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 844072/- | खुला |
| 46 | Providing Natural Trail Towords Pagoda -1 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 840402/- | खुला |
| 47 | Providing Natural Trail Towords Panchavati Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 842851/- | खुला |
| 48 | Providing Natural Trail Towords Rashi Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 834282/- | खुला |
| 49 | Providing Panchavati Van in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 789341/- | खुला |
| 50 | Providing Rashi Van Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 828522/- | खुला |
| 51 | Providing Rock Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 800748/- | खुला |
| 52 | Providing Sand Pit in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 701933/- | मजुर संस्था |
| 53 | Site cleaning and Levelling in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 285200/- | मजुर संस्था |
| 54 | Providing Entrance Kaman - 01 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 767910/- | मजुर संस्था |
| 55 | Providing Entrance Openable MS Gate - 2 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 616524/- | मजुर संस्था |
| 56 | Providing Entrance Kaman - 02 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 767910/- | मजुर संस्था |
| 57 | Providing Entrance Openable MS Gate - 1 in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 616524/- | मजुर संस्था |
| 58 | Providing Stone Pathway towords eco pond in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 841234/- | मजुर संस्था |
| 59 | Providing Stone Pathway towords Watch Tower in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 820289/- | मजुर संस्था |
| 60 | Providing Stone Pathway in Garden Premises in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 837046/- | मजुर संस्था |
| 61 | Providing Stone Pathway towords Rock & Cactus Garden in Oxygen Park in Gut No. 1140 at Shirur in shirur (T) range of junnar division. | 837046/- | मजुर संस्था |

**अटी व शर्ती :** १) निविदा धारकांनी सावधानता बाळगून निविदा सादर करण्याच्या किमान १ दिवस आधी सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. निविदा धारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तावेज संबंधित कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा निविदा स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. २) सदर कामाबाबत बी १ फॉर्म वन परिक्षेत्र कार्यालय शिरूर येथन निविदा धारक यांनी प्राप्त करुन घ्यावा. ३) ज्या निविदा धारकांची निविदा मंजूर झालेली आहे, त्या कामाचे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत काम सुरु करण्यात यावे अन्यथा सदर निविदा रद्द करण्यात येईल. ४) सदर कामाचा कालावधी सदर काम हे ३१/०३/२०२७ पर्वीच पूर्ण करणे बंधनकारक राहील. ५) शासन निर्णयान्वावे शासनाने नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्ती सदर निविदेस लागू असतील. ६) सदर कामांची सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद् करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यानी राखुन ठेवलेला आहे.

**वन परिक्षेत्र अधिकारी**
**शिरूर**

## निवडणूक असली की, मी तुमच्या पाठीशी ?

# निकालानंतर टपऱ्या पाडा अशी शिंदेंची दुटप्पी भूमिका!

### व्यापाऱ्यांसाठी पर्यायी व्यवस्था असेल तरच त्यांना विस्थापित करा हीच आपली भूमिका : आ. पवार



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** मुख्याधिकारी कर्जत यांच्या अतिक्रमण संदर्भात नोटीसीवरून परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून या संबंधी शुक्रवारी आमदार रोहित पवार यांची मुख्य रस्त्यावरील व्यापारी बांधवांनी भेट घेतली. यावेळी आमदार रोहित पवारांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याबरोबर बैठक घेत कोणाच्या रोजी-रोटीवर गदा येणार नाही असे आश्वासित केले. यावेळी आमदार पवार यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदेंच्या दुटप्पी भूमिकेवर देखील टीकास्त्र सोडले.

यावेळी बोलताना आमदार पवार म्हणाले की, रस्ता मोठा होत असेल तर ती सर्वांसाठी चांगलीच गोष्ट आहे. मात्र ज्यांची रोजी-रोटी याच व्यवसायावर आहे. त्यांची पर्याय व्यवस्था न करता त्यांना घरी बसवने किंवा त्यांचा व्यवसाय बंद करीत परिवारास अडचणीत आणणे न शोभणार आहे. वास्तविक पाहता आपण हीच दूरदृष्टी समोर ठेवत कर्जत बसस्थानक परिसरात २२ व्यापारी गाळे आणि जुनी पंचायत समिती येथे १०० गाळे निर्माण केले होते. त्या गाळ्यांचे ह्या सत्ताधाऱ्यांनी काय केले ? हे आपणांस ठावूक आहे. मागच्या दाराने आमदारकी मिळवली. त्यांनतर सभापतीपद देखील मिळवले मग या पदाचा उपयोग भजी तळण्यासाठीच बसले आहे का ? असा सवाल उपस्थित केला. एक तर स्वता निधी आणायचा नाही. आणि आपण निधी उपलब्ध केला की त्याला आडवायला छान जमतं असे म्हणत विधान परिषदेचे सभापती राम शिंदेंचे नाव न घेता आमदार रोहित पवार यांनी व्यापारी बांधवांसमोर चांगलेच खडे बोल सुनावले. खरे पाहता विधानसभा निवडणुकीत याच महाशयांनी कोणत्याही टपरीस हात लावणार नाही असे बजावून सांगितले. आणि आता निवडणूक झाली की टपऱ्या पाडा असे बोलत आहे ही दुटप्पी भूमिका आपल्याला जमणार नाही. आपण विश्वास ठेवा १२ ऑगस्टला जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी कर्जतच्या या प्रश्नांवर बैठक बोलावली आहे. आपल्या सर्वांची भूमिका त्यांच्या समोर लोकप्रतिनिधी या नात्याने निश्चित मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो आणि यावर योग्य सकारात्मक तोडगा काढू असे आश्वासन कर्जतच्या व्यापारी बांधवांना दिले. यावेळी कर्जत व्यापारी असोसिएशनच्यावतीने आमदार पवार यांना निवेदन देण्यात आले.

**कर्जतच्या व्यापारी बांधवांचे नेमके म्हणणे काय**

कर्जत शहरातून बायपास किंवा रिंगरोड करावा. जेणेकरून अवजड वाहने शहराच्या बाहेरून जातील. यासह स्थानिक प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि व्यापाऱ्यांची संयुक्त बैठक घेत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी वाहतूक नियंत्रक अभ्यास समिती नेमत त्याची सुनावणी सार्वजनिक करावी. अतिक्रमित व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करून त्यांना पर्यायी गाळे उपलब्ध करावे. तसेच जोडरस्ते यांचा विचार करून व्यापारी बांधवांचा हिताचा निर्णय घ्यावा या आशयाचे निवेदन कर्जत व्यापारी असोसिएशनने आमदार रोहित पवार यांना दिले.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात बीसीए अभ्यासक्रमास मान्यता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळी ढोकेश्वर :** श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून बीसीए या रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रमास मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च दर्जाचे शिक्षण आपल्या परिसरातच उपलब्ध होणार आहे. मा. रामचंद्र दरे, डॉ.विवेक भापकर, अ‍ॅड. विश्वासराव आठरे, मुकेश मुळे, अ‍ॅड.दीपलक्ष्मी म्हसे, सीताराम खिलारी तसेच सर्व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शन व प्रयत्नांमुळे हा नवीन अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. आजच्या डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. बीसीए अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वेब डिझाईन, डेटाबेस मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा आणि विविध आयटी क्षेत्रातील आधुनिक कौशल्यांचे शिक्षण मिळणार असून, रोजगार व उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. प्रा. डॉ.लक्ष्मण मतकर यांनी या मान्यतेबद्दल संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानत विद्यार्थी व पालकांना अभ्यासक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या महाविद्यालयाच्या ध्येयपूर्तीत हा अभ्यासक्रम महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या नवीन अभ्यासक्रमास मान्यता मिळाल्याबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त करून संस्थेचे पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे अभिनंदन केले.लवकरच बीसीए अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ होणार असून इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून प्रवेशाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

## दखल

### गटविकास अधिकारी सोनल शहा यांचा विविध संघटनांकडून सन्मान




**शेवगाव :** शेवगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती सोनल शहा यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा-२०२४ मधून सहायक राज्य कर आयुक्त या पदावर निवड झाल्याने तालुक्यात त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक संघटनांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा परीक्षा-२०२४ ची अंतिम गुणवत्ता यादी ८ एप्रिल २०२६ रोजी जाहीर केली होती. त्यानंतर ३० एप्रिल २०२६ रोजी शिफारसपत्र निर्गमित करण्यात आले. या शिफारशीनुसार महाराष्ट्र शासनाने २८ जुलै २०२६ रोजी सहायक राज्य कर आयुक्त पदाचे नियुक्ती आदेश जारी केले. राज्यसेवा परीक्षेत यश संपादन करून वर्ग-१ पदावर निवड झाल्यानंतर त्या नव्या जबाबदारीची सूत्रे स्वीकारणार आहेत. यावेळी रामकिसन मडके, संजय आंधळे, रोहण लांडे यांच्या हस्ते त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीराम चव्हाण, सचिन भाकरे उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून नव्या पदावरही त्या कार्यक्षम व लोकाभिमुख प्रशासनाची परंपरा कायम ठेवतील, असा विश्वास व्यक्त केला.

### भाळवणीत महाराजस्व अभियानांतर्गत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर संपन्न



**भाळवणी :** राज्य शासनाच्या वतीने पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेचे महसूलविषयक प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाळवणी (ता. पारनेर) येथील नंदनवन लॉन्स येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजन महसुल विभागाच्या वतीने नुकतेच करण्यात आले होते. याप्रसंगी लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत कृषी, भुमी अभिलेख, आरोग्य, शिक्षण, सहकार, बँकिंग, परिवहन, वन, पंचायत समिती, पोस्ट, नगरपंचायत, दुय्यम निबंधक, महावितरण, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम, पशुसंवर्धन आदी सुमारे १७ विभागांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना सेवांचा लाभ देण्यात आला. या शिबीराच्या अध्यक्षस्थानी आ. काशिनाथ दाते होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी विश्वनाथ कोरडे, वसंतराव चेडे, प्रशांत गायकवाड, राहुल शिंदे, विक्रम कळमकर, उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर, तहसिलदार श्रीमती गायत्री सौंदाणे, मिलिंद कुलथे, संभाजी आमले, दिलीप दाते, संदीप रोहोकले, संदीप ठुबे, अरुण रोहोकले तसेच कृषी, सहकार, आरोग्य, शैक्षणिक, महावितरण, शेतकरी महिला बचतगट, वनविभागाचे अधिकारी कर्मचारी व लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

### ज्ञानदीप विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश



**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता चौथी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता सातवी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये शेवगाव येथील ज्ञानदीप मंदिर प्राथमिक व समर्थ ज्ञानदीप माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत श्रेयस गायके याने विद्यालयात प्रथम क्रमांक, तर सिद्धार्थ दसपुते याने द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत स्वानंदी मोहिते हिने प्रथम क्रमांक, प्रसाद आंधळे याने द्वितीय क्रमांक आणि अनुष्का मगर हिने तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या यशात मानाची भर घातली. या यशाबद्दल शाळा समिती अध्यक्ष संजय फडके , इतर पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक,विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वृंद, पालक वृंद यांकडून गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ’नवजीवन ॲग्रो प्रॉडक्ट्स’च्या उत्पादनांची प्रयोगशाळा तपासणी करण्याची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**श्रीगोंदा :** विनापरवाना आणि संशयास्पद पद्धतीने आयुर्वेदिक उत्पादने ऑनलाइन विक्री होत असल्याचा गंभीर आरोप करत श्रीगोंद्यातील चार सामाजिक कार्यकर्ते यांनी अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित उत्पादनांची तातडीने चौकशी करून नमुने जप्त करत प्रयोगशाळेत तपासणी करावी आणि दोषी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.तक्रारदार विजय कुंडलिक मांडे, सुभाष गुलाब शिंदे, शिवाजी गणपत साळुंखे आणि अंकुश तुकाराम शिंदे यांनी सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, अहिल्यानगर यांच्याकडे ही तक्रार सादर केली आहे.तक्रारीनुसार, 'नवजीवन ॲग्रो प्रॉडक्ट्स' या कंपनीकडून मधुमेहासाठी आयुर्वेदिक लिक्विड औषध व गोळ्या ऑनलाइन खरेदी करण्यात आल्या. मात्र संबंधित उत्पादनाच्या पॅकेजिंगवर आवश्यक उत्पादन परवाना नमूद नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक हे सुरक्षित डिजिटल प्रिंटऐवजी साध्या रबर स्टँपने छापण्यात आल्याने उत्पादनाच्या विश्वासार्हतेबाबत संशय निर्माण होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.तक्रारदारांनी अन्न व औषध प्रशासनाला संबंधित उत्पादन केंद्र व गोदामाची तपासणी करून उत्पादनाचा साठा जप्त करावा, नमुने प्रयोगशाळेत पाठवावेत आणि अन्न सुरक्षा व औषध कायद्याचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित कंपनी व मालकावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.यासोबतच उत्पादनाच्या पॅकेजिंगचे छायाचित्र आणि अन्य कागदपत्रेही प्रशासनाकडे सादर करण्यात आली आहेत. या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अतिक्रमण हटवा... अन्यथा उपोषण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** राशीन ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गट क्र. १४७६ व १४७७ वरील कथित अतिक्रमणाच्या प्रश्नावर आता संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहे. अतिक्रमणधारकांवर तातडीने कारवाई झाली नाही तर १ ऑगस्ट पासून आमरण उपोषण छेडण्यात येईल, असा थेट इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राशीन यांच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी नितीन साळवे यांच्या नेतृत्वाखाली गटविकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात १४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या अतिक्रमणासंदर्भातील बातमीचा संदर्भ देत प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनात म्हंटले आहे की, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या गट क्र. १४७६ व १४७७ वरील सर्व अतिक्रमणे हटवून त्या जागेचा विकास जनहितासाठी करण्यात यावा. त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर व व्यापारी गाळे उभारून स्थानिक व्यावसायिकांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून द्यावेत, पोलीस स्टेशन, कृषी विभाग व पोस्ट ऑफिससाठी जागा द्यावी, पाणीपुरवठा, सुलभ शौचालय, पार्किंग, रस्ते व गटारी यांसारख्या मूलभूत सुविधा निर्माण कराव्यात, ग्रामपंचायतीचे प्रशस्त प्रशासकीय भवन उभारण्यात यावे तसेच भांबोरा रोडवरील मंगळवारचा आठवडे बाजार या ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वीकृत सदस्य आरक्षण द्या : पालवे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जय हिंद फौंडेशनची ग्रामविकास सचिवांकडे मागणी**

**चिचोंडी शिराळ :** देशाच्या संरक्षणासाठी आयुष्य पणाला लावणाऱ्या आजी-माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षण व स्वीकृत सदस्य म्हणून संधी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी जय हिंद फाउंडेशनचे संस्थापक शिवाजी पालवे यांनी राज्याचे ग्रामविकास सचिवांकडेनिवेदनाद्वारे केली आहे.



जय हिंद फाउंडेशन आणि राज्यातील विविध सैनिक संघटनांच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपाल आणि निवडणूक आयोगाकडे या संदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते थेट राज्यसभेपर्यंत सैनिकांचे प्रतिनिधी असावेत, यासाठी विशेष आरक्षणाची मागणी करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेमध्ये माजी सैनिकांसाठी किमान १ जागा आरक्षित असावी. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर होणाऱ्या निवडीमध्ये प्रत्येक ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेत १ माजी सैनिकाला 'स्वीकृत सदस्य' म्हणून संधी दिली जावी. त्याचप्रमाणे शिक्षक मतदारसंघाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात ७ विभागांमध्ये 'सैनिक मतदारसंघ' तयार करून ७ सैनिक आमदार निवडून दिले जावेत.व विधान परिषद, राज्यसभा आणि राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये माजी सैनिकांसाठी १ जागेचे आरक्षण असावे. आर्थिक परिस्थिती नसली तरी सामाजिक कार्य मोठे! अनेक माजी सैनिक सेवा निवृत्तीनंतर गावोगावी, तालुक्यात व जिल्ह्यात अत्यंत कौतुकास्पद सामाजिक कार्य करत आहेत. सैनिकांचे कामकाज शिस्तप्रिय, प्रामाणिक आणि सत्याची साथ देणारे असते. मात्र, आर्थिक परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे किंवा निवडणूक लढवणे शक्य नसल्याने हे सैनिक राजकीय प्रक्रियेपासून दूर राहतात.

## वाढदिवसाचा खर्च टाळून रस्त्याचे खड्डे बुजवले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळत सामाजिक बांधिलकी जपत सुनील प्रभाकर लवांडे यांनी तिसगावमधील डिव्हायडरमध्ये रस्ता बदलण्यासाठी ठेवलेल्या मोकळ्या जागेत मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः रस्ता बदलताना दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना अपघाताचा धोका निर्माण होत होता.

ही बाब लक्षात घेऊन सुनील प्रभाकर लवांडे यांनी स्वतःच्या वाढदिवसावरील खर्चाला फाटा देत डम्परद्वारे मुरूम टाकून हे खड्डे बुजवले. त्यामुळे वाहनधारकांची मोठी गैरसोय दूर झाली.

या सामाजिक उपक्रमाबद्दल संजय लवांडे, विक्रम ससाणे, अक्षय साळवे, मनोज ससाणे, सतिश साळवे आणि मन्सूर पठाण यांनी सुनील प्रभाकर लवांडे यांचे आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. व्यापारी वर्गानेही अशा समाजहिताच्या उपक्रमांचे स्वागत केले आहे.

## शनिवारी कर्जतला आर्चक पुरोहित सेवा शिबीर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** शनिवार, दि १ ऑगस्ट रोजी कर्जत येथे विश्व हिंदू परिषद व मंदिर आर्चक पुरोहित संघाच्या संयुक्त विद्यमाने आर्चक पुरोहित सेवा शिबीर आयोजित करण्यात आले असून कर्जतसह जामखेड आणि श्रीगोंदा येथील सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन कर्जतचे अध्यक्ष उमेश चावरे यांनी पत्रकार परिषदेत केला. याप्रसंगी नगरसेवक प्रसाद जेवरे, संदीप सागडे, मनोज पाठक, रत्नाकर भणगे, आशिष निलंगे, सागर पाठक, प्रतीक भणगे, ओम कुलकर्णी, मनोज निलंगे आदी उपस्थित होते. विश्व हिंदू परिषद व मंदिर आर्चक पुरोहित संघाच्या संयुक्त विद्यमाने आर्चक पुरोहित सेवा शिबीराचे आयोजन कर्जत शहरात हॉटेल साई प्युअर व्हेज येथे शनिवारी सकाळी ११ ते ४ या कालावधीत पार पडणार आहे. या सेवा शिबिरात बजरंग दलाचे राष्ट्रीय संयोजक विवेक कुलकर्णी, वेदशास्त्रक पांडुरंग शास्त्री देशमुख सत्कारमूर्ती असणार असून यासाठी समर्थ रामदास मठाचे मोहनबुवा रामदासी, विश्व हिंदू परिषदचे जिल्हा संपर्क प्रमुख श्रीकांत नांदापूरकर यांच्यासह कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. सुधीर भापकर आणि स्वागताध्यक्ष नगरसेवक प्रसाद ढोकरीकर उपस्थित राहणार आहेत. या सेवा शिबिरात महाराष्ट्र शासनाचे स्वायत्त अमृत संस्थाकडून उपस्थितांची आरोग्य तपासणी, ई श्रम कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड यासह शासनाच्या विविध लाभाच्या योजनेबद्दल माहिती देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा कर्जतसह जामखेड आणि श्रीगोंदा येथील सर्वसामान्य नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन उमेश चावरे यांनी केले.

## शेवगाव जि.प.प्राथ. मुलींच्या शाळेत दोन नवीन वर्गखोल्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत शेवगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलींची शाळा (जुना कोर्ट परिसर) येथे दोन नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाचा शुभारंभ आज आमदार मोनिकाताई राजळे यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थी, पालक व नागरिकांनी आमदार मोनिकाताई राजळे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. यावेळी मार्गदर्शन करताना आ. मोनिका राजळे म्हणाल्या की, इतर विकासकामांच्या शुभारंभापेक्षा चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या वर्गखोल्यांच्या कामाची सुरुवात करताना वेगळाच आनंद मिळतो. विद्यार्थ्यांना चांगल्या व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. यावेळी शैलजा रावळ, महेश फलके, दीपाली काथवटे, डॉ. गीता लांडे, आशा बुलबुले, सागर फडके, नितीन दहिवाळकर, कमलेश गांधी, गणेश कोरडे, भीमराज सागडे पाटील, गणेश रांधवणे, डॉ. कृष्णा देहाडराय, बाप्पू धनवडे, महिला आघाडीच्या उषाताई कंगनकर, ज्ञानेश्वर देहाडराय, माजी सरपंच सतीशराव लांडे, कैलास सोनवणे, सुरेश लांडे, शिवाजी आधाट, अमोल माने, सोमनाथ सोनवणे, राहुल वरे, सुरेश थोरात, गुरुनाथ माळवदे, शिवाजी समिंदर, संतोष कंगनकर, सोमनाथ वीर, नवनाथ अमृत, शिक्षिका प्रांजलशिंदे, पंचायत अभियंता वावरे ठेकेदार, किशोर अडबल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

# वरूर सेवा संस्थेविरोधात माहिती अधिकार कायदा उल्लंघनाची तक्रार

### ७ माहिती अर्ज फेटाळले; सचिव, चेअरमन व माहिती अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगांव :** शेवगाव तालुक्यातील वरूर (बु.) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या सात स्वतंत्र अर्जांवरील माहिती बेकायदेशीरपणे नाकारल्याचा आरोप करत संबंधित सार्वजनिक माहिती अधिकारी, सचिव आणि चेअरमन यांच्याविरुद्ध प्रशासकीय, कायदेशीर व शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत वरूर बुद्रुक येथील काकासाहेब रमेश म्हस्के यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शेवगाव तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारीनुसार, अर्जदाराने ९ जुलै २०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत सार्वजनिक स्वरूपाची माहिती मिळण्यासाठी सात स्वतंत्र अर्ज सादर केले होते. मात्र, संस्थेने २३ जुलै २०२६ रोजी कोणताही जावक क्रमांक नसलेले पत्र देत माहिती नाकारली. या उत्तरामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही वैध तरतुदीचा आधार न घेता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचा चुकीचा आधार घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.



तक्रारदाराने माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ६(२) चे उल्लंघन झाल्याचाही दावा केला आहे. अर्जदाराच्या माहिती मागण्यामागील हेतूचा उल्लेख करून माहिती नाकारण्यात आली असून, हा प्रकार कायद्याच्या विरोधात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच माहिती नाकारताना संबंधित कायदेशीर कलमांचा, प्रथम अपीलाच्या अधिकाराचा किंवा अपील प्राधिकाऱ्याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

तक्रारीत आणखी असा आरोप करण्यात आला आहे की, सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याने देण्याच्या उत्तरावर सचिव आणि चेअरमन यांच्या स्वाक्षऱ्या व शिक्क्यांचा वापर करण्यात आला असून, हा अधिकारबाह्य हस्तक्षेप असल्याची चौकशी व्हावी. तसेच संस्थेने दिलेल्या पत्रावर जावक क्रमांक नसल्याने ते प्रशासकीयदृष्ट्या नियमबाह्य असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

सातही अर्जांना स्वतंत्रपणे विचार न करता एकाच छापील नमुन्यातील उत्तर देण्यात आल्यामुळे माहिती अधिकार कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासण्यात आल्याचा आरोपही तक्रारदाराने केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ७(६) नुसार आता संबंधित माहिती अर्जदारास पूर्णपणे मोफत उपलब्ध करून द्यावी तसेच विलंब व कथित बेकायदेशीर नकाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

तक्रारदाराने संबंधित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून सार्वजनिक माहिती अधिकारी, सचिव आणि चेअरमन यांच्याकडून लेखी खुलासा मागविणे, आवश्यक असल्यास शिस्तभंगाची कारवाई करणे, नियमबाह्य पत्र रद्दबातल ठरविणे आणि भविष्यात अशा त्रुटी टाळण्यासाठी संबंधित पदाधिकाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्याचे निर्देश देण्याचीही मागणी केली आहे.

सदर तक्रारीवर सहकार विभागाकडून काय भूमिका घेतली जाते आणि चौकशीनंतर कोणती कारवाई केली जाते, याकडे शेवगाव तालुक्यातील सहकारी संस्थांशी संबंधित सभासद व नागरिकांचे लक्ष लागले आहे.




# मुळाचे पाणी जायकवाडीला देण्याचे संकट टळले

## जायकवाडीचा साठा ६८ टक्क्याहून पुढे

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्याची जलसंजीवनी समजल्या जाणाऱ्या मुळा धरणातून अखेर जायकवाडी धरणाला अहिल्यानगर जिल्ह्यातील व नाशिक जिल्ह्यातून पाणी देण्याचे संकट तूर्त तरी टळले आहे. जायकवाडी धरणाचा साठा ७३ टक्क्यांच्या पुढे पोहोचला असल्याने त्यातील उपयुक्त साठा ५६% समजला जातो. त्यामुळे अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातील धरणांमधून समन्यायी पाणी वाटप कायदा २०२५ मधील तरतुदीनुसार पाणी सोडण्याची आवश्यकता नसल्याचे दिसून येत आहे. सध्याच्या स्थितीत जायकवाडी धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा हा सुमारे ८२ टी एम सी वर पोहोचला असून उपयुक्त साठा ५६% इतका झालेला आहे.

त्यामुळे प्रचलित असलेल्या समन्यायी पाणी वाटप कायदा- २००५ मधील तरतुदीनुसार नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यांतील धरण समूहांमधून पाणी सोडण्याची आवश्यकता नसल्याची माहिती जल अभ्यासक व सेवानिवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी दिली आहे त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातून जायकवाडी धरणाला पाणी देण्याचे सध्या तरी संकट टळल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण पसरले असून पिण्याच्या पाण्याबरोबर शेतीच्याही पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटल्याचे चिन्ह दिसत आहे.

मुळा धरणातील सध्याचा साठा १८ टीएमसीच्या पुढे गेल्यामुळे धरण सुमारे ७० टक्क्यांच्या पुढे गेले आहे. अजून सुमारे दोन महिने पावसाचे शिल्लक असल्याने धरण भरण्याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे. मुळा धरणाकडे काल सुमारे ६ क्युसेसने पाण्याची आवक सुरू असल्याने मुळा धरण भरण्याची आशा शेतकरी व नागरिक करीत आहेत.

# दारूविक्री, मटका अड्ड्यावर सिंघम स्टाईल छापे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील पठार भागातील साकूर व परिसरातील अवैध धंद्यांविरोधात घारगाव पोलिसांनी मंगळवार (दि.२७) जुलै रोजी धडक कारवाई केली. सलग छापेमारीत देशी-विदेशी दारूचा साठा, जुगाराचे साहित्य असा एकूण ३१ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत चौघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घारगाव पोलिसांच्या पथकाने मांडवे बुद्रुक येथील लिंबफाटा येथील हॉटेल स्टेटस परिसरात कारवाई करत अशोक भिमाजी धुळगंड (वय ४२,रा.मांडवे बुद्रुक ) याच्याकडून ४२६०/- रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत.त्यानंतर हॉटेल नवजीवन येथे सुनील रभाजी बाचकर (वय २५, रा. मांडवे बुद्रुक) याच्याकडून ८८० रुपयांच्या देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. तर ज्ञानेश्वरी टपरीच्या आडोशाला ममताजी किसन डोलनर (वय ६८, रा. डोलनर वस्ती मांडवे बुद्रुक) याच्याकडून ९६० रुपयांच्या देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. यांचे विरुद्ध घारगाव पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या धाड मोहिमे दरम्यान साकूर येथील भिल्लहाटी भागात सुरू असलेल्या कल्याण मटका अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला.या छाप्यात सुशील राजू गायकवाड (वय २५ वर्ष , रा.साकुर) हा आलिम पटेल (रा.साकुर) यांच्या सांगण्यावरून मटका चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.या कारवाई दरम्यान घटनास्थळावरून २५ हजार ७४० रुपयांची रोख रक्कम, मटका साहित्य आणि अन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई घारगाव पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रवीण महाले, पोलिस कॉन्स्टेबल प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे व घारगाव पोलिस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# शिर्डी रेल्वे स्टेशनजवळ दरोड्याच्या तयारीतील सात जण जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शिर्डी रेल्वे स्टेशनजवळ दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या एका सराईत टोळीचा अहिल्यानगर क्राईम ब्रांचने पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी ७ जणांना रंगेहात ताब्यात घेतले असून, अंधाराचा फायदा घेऊन इतर दोन आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. दिनांक ३१ जुलै २०२६ रोजी अहिल्यानगर क्राईम ब्रांचचे पथक परिसरात पेट्रोलिंग करत असताना, शिर्डी रेल्वे स्टेशनजवळील रेल्वे ट्रॅकच्या बाजूला काही संशयास्पद तरुण दरोडा टाकण्याच्या तयारीत थांबले असल्याची गोपनीय माहिती क्राईम ब्रांचला मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पडताळणी केली असता, रेल्वे ट्रॅकच्या पोलच्या आडोशाला काही संशयित व्यक्ती बसलेल्या दिसल्या. पोलिसांना पाहताच या सर्वांनी तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र सतर्क असलेल्या पोलीस पथकाने पाठलाग करून ७ जणांना जागीच ताब्यात घेतले, तर दोन आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले. या प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आणि पळून गेलेल्या आरोपींवर शिर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३१०(४), ३१०(५) आणि आर्म ॲक्ट ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पळून गेलेल्या आरोपींमध्ये अमोल नामदेव धोत्रे आणि बाबू धोत्रे (दोन्ही रा. इंदिरानगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर) यांचा समावेश असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. क्राईम ब्रांचला वेळोवेळी पेट्रोलिंगचे आदेश देण्यात आले असून गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पुढेही अशीच कडक पावले उचलली जातील, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले असून या प्रकरणाचा पुढील तपास शिर्डी पोलीस करत आहेत.

# गाई लपविल्याच्या संशयावरून दोघा भावांना बेदम मारहाण

## सहाजणांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे गाई लपवून ठेवल्याच्या संशयावरून दोघा भावांना लाकडी दांडा, लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २५ जुलै रोजी पहाटे घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिलाल गफार कुरेशी (वय २९) व त्यांचा भाऊ शाहिद हे २५ जुलै रोजी पहाटे एकच्या सुमारास मोटारसायकलवरून राहुरीकडे जात असताना वांबोरी येथील देहरे वेशीजवळ आरोपींनी त्यांना अडवले. तुम्ही लपवून ठेवलेल्या गाई कुठे आहेत, अशी विचारणा केली. त्यावर बिलाल यांनी याबाबत कोणतीही माहिती नसल्याचे सांगितल्याने आरोपी संतप्त झाले. त्यांनी दोघांना शिवीगाळ करत लाकडी दांडा, लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच गाईंबाबत माहिती न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी बिलाल कुरेशी यांच्या फिर्यादीवरून गणेश मच्छिंद्र कुसमुडे, तुषार बाळू सुपारे, ऋतिक कुसमुडे, सुरज कुसमुडे, सिद्धार्थ धनवडे यांच्यासह एकूण सहाजणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अखेर सोनाली नाईकवाडी यांची नगराध्यक्षापदी निवड

**सोमनाथ डोळे | राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : अकोले नगरपंचायतचे नगराध्यक्ष निवडीसाठी भाजपच्या महिला आघाडीच्या प्रदेश सचिव सोनाली नाईकवाडी यांची निवड झाली. भाजपच्याच वैष्णवी धुमाळ यांनी माजी आमदार वैभव पिचड यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरल्याने निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची झाल्याने नगराध्यक्षा कोण होणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती.अखेर सोनाली नाईकवाडी यांनी बाजी मारल्याने माजी आमदार वैभव पिचड यांना धोबीपछाड दिला आहेत. शुक्रवारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या आदेशानुसार शुक्रवारी (३१ जुलै) रोजी सकाळी ११ वाजता पिठासीन अध्यक्ष प्रांतधिकारी अरुण उंडे यांनी नगराध्यक्षा निवडीसाठी विशेष बैठक बोलावली होती. गेल्या सहा ते सात महिन्यापासून या राजकीय सत्ता नाट्याचा शुक्रवारी शेवट झाल्या असून अकोले नगरपंचायत मध्ये पुढील सहा महिन्यांसाठी सोनाली नाईकवाडी पर्व सुरू झाले आहेत. या निवडणुकीत सोनाली नाईकवाडी यांना ११ मते पडली तर, वैष्णवी धुमाळ यांना अवघी सहा मते पडल्याने सोनाली नाईकवाडी यांच्याकडे बारा मतांचा गट असताना एक मत कोणाचे फुटले अशी चर्चा सुरु आहेत. निवडणुकीत कोणतीही 'रिस्क नको' म्हणून सातजणांचा गट हा काही दिवस पर्यटनाला गेल्याचे दिसुन आले होते.वादविवाद व तणावस्थिती लक्षात घेऊन प्रसाशनाकडुन तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.यावेळी माजी आमदार वैभव पिचड समर्थक मोठ्या संख्येने जमा झाले होते. भारतीय जनता पार्टीचा विजय असो, 'वैभवभाऊ तुम आगे बढो' अशा घोषणा देऊन नगरपंचायत परिसर दणानून गेला होता. यावेळी माजी आमदार पिचड यांनी आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लागल्याने आपल्या नगरसेवकांना सुचना केल्या होत्या. तुम्ही भाजपाच्या तिकिटावर उमेदवार केली असुन वैष्णवी धुमाळ यांच्या पाठीमागे उभे राहण्याचे अवाहन केले होते.ज्यांचा प्रचार करून निवडून आणलेले नगरसेवकच विरोधात गेल्याने माजी आमदार वैभव पिचड यांच्यावर पराभवाची नामुष्की ओढावली गेल्याचे चित्र समोर आले. आगामी सहा महिन्यात उपनगराध्यक्ष, निवड,निधी वाटपावरुन होणार सावळा गोंधळ, गटबाजी, विकासनिधी तसेच कोणती भरीव कामे राबवली जाणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहेत.

# हळदीच्या कार्यक्रमात चोरी करताना महिलेस रंगेहात पकडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहरातील व्यंकटेश मंगल कार्यालय येथे हळदी समारंभ चालू असताना एका महिलेला चोरी करताना रंगेहात पकडुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही घटना दि. ३० जुलै रोजी रात्रीच्या वेळी घडली. प्रकाश प्रभाकर शिरसाट, वय ५० वर्षे, रा. देसवंडी, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, राहुरी शहरातील व्यंकटेश मंगल कार्यालय येथे दि. ३१ जुलै २०२६ रोजी प्रकाश शिरसाठ यांच्या मुलीचा विवाह सोहळा असल्याने दि. ३० जुलै रोजी रात्री ८ वाजता कार्यालयात हळदीचा कार्यक्रम होता.

कार्यक्रमाला वर आणि वधुकडील नातेवाईक कार्यालयात आले होते. प्रकाश शिरसाट यांनी सामान ठेवण्यासाठी तसेच झोपण्यासाठी एक रुम घेतली होती. सदर रुममध्ये त्यांच्या पिशव्या व सामान ठेवले होते. हळदीचा कार्यक्रम चालु असताना प्रकाश शिरसाट यांच्या भावजई रुपाली नानासाहेब शिरसाट ह्या सामान व पिशव्या ठेवलेल्या रुममध्ये गेल्या. त्यावेळी त्या रुममध्ये एक अनोळखी महीला पिशव्यांची उचका पाचक करताना दिसली.

तेव्हा रुपाली शिरसाट यांनी तीला विचारले की तुम्ही कोण आहात व येथे कशाला आला आहात? असे विचारले असता तिने उडवा उडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली.

तेव्हा रुपाली शिरसाट यांनी इतर नातेवाईकांना तेथे बोलावुन घेतले. त्यानंतर सदर महिलेला पकडुन राहुरी पोलीस ठाण्यात आणून पोलिसांच्या स्वाधीन केले.

प्रकाश प्रभाकर शिरसाट यांच्या फिर्यादीवरून आरोपी सविता भाउसाहेब साबळे, रा. सागर हॉटेलच्या पाठीमागे श्रीराम चौक पाईपलाईन रोड, अहिल्यानगर, हल्ली रा. दत्ताचे शिंगवे, ता. मनमाड, जि नाशिक हिच्या विरोधात गुन्हा रजि. नं. ८५०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

# राहुरी तालुक्यातील वेलनेस मार्केटिंगवर अन्न प्रशासनाची कारवाई

## ५.६० लाखांचा फूड सप्लिमेंट साठा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**







**राहुरी** : दिशाभूल करणारे दावे, लेबलिंगमधील नियमभंग तसेच अन्न सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी राहुरी तालुक्यातील मुसळवाडी येथील मे. आरंभ वेलनेस मार्केटिंग प्रा. लि. या आस्थापनेवर अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा विभागाने कारवाई केली. या कारवाईत 'अरे वा' कंपनीची स्लिम पावडर आणि ऑर्थो प्लस पावडर ही फूड सप्लिमेंट उत्पादने असा एकूण ५ लाख ६० हजार ९२८ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढेंसह नाशिक विभाग आयुक्त मंगेश माने तसेच सहाय्यक आयुक्त (अन्न) श्रीमती ए. ए. भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मुसळवाडी येथील गट क्रमांक २१९ येथे असलेल्या आरंभ वेलनेस मार्केटिंग प्रायव्हेट.

लिमिटेड या संस्थेची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान 'अरे वा' स्लिम पावडर आणि 'अरे वा' ऑर्थो प्लस पावडर या फूड सप्लिमेंट उत्पादनांबाबत नियमभंग आढळून आला. अन्न विभागाच्या माहितीनुसार, संबंधित उत्पादनांवर दिशाभूल करणारे दावे करण्यात आले होते. तसेच उत्पादनांच्या लेबलिंगमध्येही नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. सदर उत्पादने भेसळयुक्त व दर्जाहीन असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित आस्थापनेच्या एफएसआय परवान्यामध्ये 'रिपॅकिंग' या श्रेणीचा समावेश नसतानाही फूड सप्लिमेंटचे रिपॅकिंग केले जात असल्याचे तपासणीदरम्यान आढळून आले. त्यामुळे अन्न सुरक्षा विभागाने संबंधित उत्पादनांचा साठा जप्त करून पुढील कार्यवाही सुरू केली. तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा कायदा, २००६ अंतर्गत अनुसूची-४ मधील गंभीर उल्लंघने निदर्शनास आल्याने सहाय्यक आयुक्त भोईटे यांनी मे. आरंभ वेलनेस मार्केटिंग प्रा. लि., गट क्र. २१९, मुसळवाडी, ता. राहुरी येथील आस्थापनेचा एफएसआय परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित केला आहे.

तसेच संबंधित संस्थेला जप्त केलेल्या उत्पादनांच्या व्यवसायाबाबत व्यवसाय बंद नोटीस बजावण्यात आली. दरम्यान, याच संस्थेचे देवळाली, ता. राहुरी येथील किरकोळ विक्रीचे दुकान परवान्याशिवाय सुरू असल्याचे तपासणीदरम्यान आढळून आले. त्यामुळे अन्न सुरक्षा अधिकारी यू आर. पाटील यांनी संबंधित दुकानालाही व्यवसाय बंद नोटीस बजावली आहे. या कारवाईमुळे राहुरी तालुक्यातील एकच खळबळ उडाली आहे.

# पुणे-नाशिक महामार्गवरील प्रसिद्ध 'फाउंटन हॉटेल'वर एफडीएची धडक कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा** : पुणे-नाशिक महामार्गावरील प्रवाशांचा प्रमुख आधार आणि एसटी महामंडळाचा अधिकृत थांबा असलेल्या आळेखिंड येथील नामांकित 'फाउंटन प्युअर वेज' हॉटेलवर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. किचनमधील तीव्र अस्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांच्या सर्रास उल्लंघनामुळे प्रशासनाने या हॉटेलचा परवाना तातडीने निलंबित केला आहे. मात्र, या कारवाईनंतर हॉटेल व्यवस्थापनाने काढलेली 'पळवाट' आणि प्रवाशांच्या जिवाशी सुरू असलेला खेळ सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी २२ जुलै रोजी हॉटेलवर अचानक धाड टाकली. या पाहणीदरम्यान किचनमध्ये कमालीची अस्वच्छता, खिडक्यांना जाळ्या नसल्याने माशांचा प्रचंड प्रादुर्भाव आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेशी संबंधित अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. रोज हजारो प्रवाशांच्या आरोग्याशी होणारा हा खेळ पाहून प्रशासनाने विनाविलंब हॉटेलचा परवाना निलंबित करण्याचे कठोर आदेश दिले.

### परवाना निलंबित, तरीही व्यवहार सुरूच...!

मुख्य हॉटेलवर टाळे ठोकल्यानंतर व्यवस्थापनाने एक नवी शक्कल लढवली. एसटी बसेस आणि प्रवाशांची गर्दी हातातून जाऊ नये म्हणून, शेजारीच बंद पडलेल्या आपल्या 'फाउंटन फूड अँड फन' या दुसऱ्या शाखेत रातोरात सर्व किचन व कर्मचारी हलवून कामकाज पूर्ववत सुरू केले. मुख्य शाखेवर कारवाई झालेली असतानाही एसटी बसेस बिनदिक्कतपणे या दुसऱ्या शाखेत थांबवल्या जात असल्याने, प्रवाशांच्या आरोग्याची जबाबदारी कोणाची? असा संतप्त सवाल आता नागरिक व प्रवाशांमधून विचारला जात आहे.

### प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर....!

पुणे-नाशिक मार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी हे हॉटेल अधिकृत एसटी थांबा आहे. एफडीएच्या कारवाईनंतरही पर्यायी व्यवस्थेच्या नावाखाली प्रवाशांची बोळवण सुरू असल्याने महामंडळ आणि प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कोट्यावधींची फसवणूक प्रकरणातील राहुल काळोखेला सात दिवसांची पोलीस कोठडी

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : 'लाखाची गुंतवणूक करा आणि दरमहा ८ ते १० टक्के हमखास परतावा मिळवा' या आमिषाखाली हजारो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फिजीतून भारतात आणण्यात आलेला कंपनीचा संचालक आरोपी राहुल शामराव काळोखे याला श्रीगोंदा अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे या बहुचर्चित आर्थिक घोटाळ्याच्या तपासाला वेग येणार असून अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कशी चर्चा नागरिकांमधून पुढे येत आहे. श्रीगोंदा तालुक्यात लाख गुंतवा आणि 'महिन्याला ८ ते १० टक्के परताव्याच्या' आमिषाखाली हजारो कोट्यवधींच्या गुंतवणूक घोटाळ्याचा तपास वेगात सुरु झाला आहे.सीस-पे (उखड झरू), इन्फिनिटी, बिकन, ग्लोबल ट्रेडिंग आदी कंपन्यांच्या माध्यमातून अवास्तव आणि हमखास परताव्याचे आमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक उभारण्यात आली. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला.

त्यानंतर हजारो गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रुपयांचा निधी गोळा करून त्याचा अपहार केल्याचा आरोप आहे.या प्रकरणात श्रीगोंदा, पारनेरसह राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. गुन्हा उघडकीस आल्यानंतर कंपनीचे सर्व संचालक फरार झाले. या प्रकरणी नितीन अंबादास गांगर्डे (रा मांदळी, ता कर्जत ) यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. या गुन्ह्यात रंगनाथ तुळशीराम गलांडे (रा देऊळगाव) तसेच अनिल झुंबर दरेकर (रा हिरडगाव ) यांना ७ जुले रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आल्यावर तपासाची चक्रे फिरू लागली. दि २८ आगष्ट रोजी सायंकाळी या गुन्ह्यात पांडुरंग किसन खामकर याना सनसिटी, वडगाव शेरी, पुणे येथून अटक करण्यात आली होती. यामध्ये आतापर्यंत प्रसाद प्रकाशराव कुलकर्णी (रा नांदेडसिटी पुणे),सचिन लक्ष्मण खडतरे (रा करकुंभ, ता. पंढरपूर, जि. सोलापूर),विनायक मराठे,पांडुरंग खामकर (रा पारगाव सुद्रिक, ता. श्रीगोंदा) या ५ संचालकांना अटक करण्यात आली होती.

यामध्ये आतापर्यंत संचालकांमध्ये नवनाथ जगन्नाथ औताडे (रा. फळवणी,ता. माळशिरज, सोलापूर), अगस्त राहुल मिश्रा (रा नांदेडसिटी, पुणे),राहुल शामराव काळोखे (रा. दिघी, पुणे),गौरव देविदास सुखदीवे (रा. अकोला),प्रसाद प्रकाशराव कुलकर्णी (रा. नांदेडसिटी,पुणे),सचिन लक्ष्मण खडतरे (रा. करकुंभ, ता पंढरपूर,जि. सोलापूर),ययाती राहुल मिश्रा (रा. वाघोली, पुणे),शुभम नवनाथ औताडे (रा. फळवणी, ता. माळशिरस, सोलापूर),सुवर्णा नवनाथ औताडे (रा. फळवणी, ता. माळशिरस, सोलापूर),चेतन सुनिल धर (रा. गुरगाव, हरियाणा ,प्रसाद बाजीराव देशमुख (रा .भोसरी, पुणे),हेमंत बाबासाहेब चव्हाण (रा. सतरानळी, हडपसर, पुणे),विनोद बबन गाडीलकर (रा. माळवाडी, ता. पारनेर ,अहिल्यानगर),बाळू रमेश तांगडे (रा.मोशी, पुणे),विजयमाला सचिन साखरे (रा. चिखली, पुणे),नागनाथ उमाकांत गोरे (रा. मोशी, पुणे),उमा अशोक पवार (रा. वेलापूर, ता. माळशिरज, सोलापूर),संदीप दरेकर (रा. हिरडगाव, ता. श्रीगोंदा) ,पांडुरंग खामकर (रा. पारगाव सुद्रिक, ता.श्रीगोंदा ) या संचालकांना आरोपी करण्यात आहे. या संचालकांसह श्रीगोंदा तालुक्यातील तब्बल ९८ आरोपी करण्यात आले आहेत.

संचालक मंडळातील अनेकजण विदेशात फरार झाले होते. त्यानुसार अहिल्यानगर जिल्हा आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाठपुरावा केला. तोपर्यंत यातील आरोपी राहुल काळोखे परदेशात फरार झाला होता. महाराष्ट्र पोलिसांच्या प्रस्तावानुसार केंद्रीय गुन्हे अन्वेषणने इंटरपोलमार्फत रेड नोटीस जारी केली. त्यानंतर तो फिजीमध्ये असल्याचे निष्पन्न झाल्याने तेथील अधिकाऱ्यांनी त्याला अटक केली. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ३० जुलै रोजी विशेष पथकाने त्याला भारतात आणले.न्यायालयाने दिलेल्या सात दिवसांच्या पोलीस कोठडीत आरोपीकडून फसवणुकीत वापरलेले आर्थिक व्यवहार, गुंतवणुकीची साखळी, परदेशातील व्यवहार, सहआरोपींची भूमिका आणि फसवणुकीची रक्कम याबाबत सखोल चौकशी होणार आहे. त्यामुळे या घोटाळ्यातील आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता तपास यंत्रणांकडून व्यक्त केली जात आहे.

### फरार संचालक लवकरच अटकेत

फसवणूक करणाऱ्या अनेक कंपनीच्या संचालकांमधील अनेक जण पोलिसांच्या रडारवर आहेत. त्यातील अनेकांचा पोलिसांना सुगावा लागला असल्याची खात्रीलायक माहिती आहे. त्यांनाही अटक करण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून लवकरच फरार असलेल्या संचालकांना अटक होणार असल्याची खात्रीलायक माहिती हाती आली आहे.

### गुतवणूकदारांना दिलासा

कोट्यवधी रुपयाची फसवणूक झाल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने फसवणूक प्रकरणी मालमत्ता जप्तीच्या एमपीआयडी नुसार सरकारकडे पहिला प्रस्ताव तब्बल ११४कोटी ९३ लाखाचा पाठवला होता. त्यानुसार आरोपींची बँक खाती मालमत्ता याच्यावर ताबा घेण्यात आला असून त्यातून हि रक्कम वसूल करण्यात आली असल्याने सरकारने त्यास मंजुरी मिळाली दिली आहे. यातील गुंतवणूकदारांना लवकरच दिलासा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.